म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
सं. क्र. 9302



# पावनखिंडीचा रणझुंजार

REFBK-0008895

भा. द्वा. कारखानीस

# पावनखिंडीचा रणझुंजार

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम २७७१० वि: चरित्र
क्रमांक ८०८ नों: दि: १८।१२।६१.

चरित्र १३०२

लेखक

**माधव द्वारकानाथ कारखानीस**

माजी क्यूरेटर, कार्ली लेणीं

प्रस्तावना

**म. म. द. वा. पोतदार**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ८८५

REFBK-0008895

फक्त

प्रकाशक :
सौ. सरला मा. कारखानीस
५२ टायकल वाडी
मुंबई नं. १६

सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन

प्रथमावृत्ति : १३ जुलै १९६०

मुद्रक :
चिंतामण गणेश वझे
साधना प्रेस
४३०/३१ शनवार पेठ, पुणें २

“ दिव्यत्वाची जेथ प्रचीति
तेथें कर माझे जुळती ”

ज्या महाराष्ट्रांत
छत्रपति शिवाजीमहाराज आणि रणझुंजार बाजी प्रभु देशपांडे
यांच्यासारखीं थोर रत्नें जन्मलीं
त्या माझ्या महाराष्ट्र मातृभूमीस आणि तेथील महाराष्ट्र जनतेस
ही माझी लहानशी लेखनकृति
सादर अर्पण

॥ श्री ॥

# प्रस्तावना

ज्या एका महान् प्रसंगीच्या प्राणाहुतीमुळें हिरडस मावळचा देशकुळकरणी बाजी प्रभु यानें आपलें नांव चिरंजीव केलें तो दिवस शके १५८२ शार्वरी संवत्सरीं आषाढ वद्य प्रतिपदेचा शुक्रवार होय. त्या वर्षीचा हा दिवस खिस्ती कालगणनेप्रमाणें १३ जुलै पडला होता. यंदा या घटनेला, शकें १८८२ आषाढ वद्य १ ला, तीनशें वर्षें होतात. खिस्ती गणनेप्रमाणें हा दिवस यंदाचा ९ जुलै पडतो, १३ जुलै नाहीं. म्हणून आपल्या, शालिवाहनी गणनेप्रमाणें—आणि बाजी—शिवाजी हीच गणना वापरीत होते आणि आजच्या लोकशाही भारत सरकारनें शालिवाहनी शकगणनाच मान्य केली आहे — बाजीचें स्मरण आषाढ वद्य १ लाच करणें युक्त ठरतें.

देशांतल्या थोर पुरुषांच्या थोर कृत्यांची आठवण सर्वांनीं प्रेमानें आणि आदरानें ठेवली पाहिजे. पूर्वीं अशीं महत्कृत्यें त्या त्या वेळीं पोवाडे करून शाहीर आणि कवित्तें रचून भाटचारण इत्यादि मंडळी लोकविख्यात करून ठेवीत. हीं कवनें अशीं वीरश्रीनें भरलेलीं असत कीं, ऐकणाऱ्याच्या छातीचे बंद तटातट तुटत असत ! एका अगदीं प्रत्यक्ष शिवाजीच्या वेळींच रचलेल्या पोवाड्याच्या तोंडाच्या तुकड्याचा एक चरणच मिळाला आहे. तो असाः—

हनुमंत अंगद रघुनाथाला । जेधे बांदल शिवाजीला ।

कोण हे जेधे आणि बांदल ? हे पुण्याजवळील बारा मावळांच्या बारा देशमुखांपैकीं दोन देशमुख ! या बारा मावळांपैकीं गुंजण मावळांतील मुरुंबदेवाच्या मुरुंबगडावर शिवाजीचा स्वराज्याचा झेंडा शके १५६२ वर्षीं फडकला असें म्हणण्यास आधार आहे. या देशमुख मंडळींत पंचसहस्त्रीसारखे हुद्दे धारण करणारी वीर मंडळी बादशाही हुकमतींत वागत होतीं. हे मावळांतील हशम पावलोक अथवा हेटकरी—पायदळी शूर वीर—शिवाजीच्या सैन्यांत प्रमुखपणें चमकत होते. हे निवळ घोंगड्ये आणि लंगोट्ये कसे असतील ! शिवाजीच्या पूर्वीं शें-दीडशें वर्षें मावळी देशमुखांच्या हाताखालीं हे मावळी पायदळ हत्यारबंद शूर म्हणून नांवाजलें होतें; आणि त्यांना दूरवरच्या मोहिमांतहि जावें लागे !

या देशमुख घराण्यांचे जुने कागदपत्र मोठ्या कष्टानें मिळवून प्रसिद्ध करण्याचे सर्व उपकार कै. विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांनींच प्रथम केले. त्याला आतां पन्नासांवर वर्षे होऊन गेलीं. खरा इतिहास जाणून घेणाराला याच कागदपत्रांचा अभ्यास केला पाहिजे. याच्या जोडीला सभासदी एक्याण्णव कलमी वगैरे मराठी बखरी, फारसी तवारिखा, फार्सी समकालीन फर्मानें, मराठी, फार्सी, कानडी, संस्कृत शिलालेख व शिवभारता-सारखे समकालीन माहितगारांनीं—परमानंद, जयराम इत्यादिकांनीं—रचलेले काव्यग्रंथ हेहि पाहिले पाहिजेत. परंतु अगदीं तारीखवार त्याच वेळीं लिहिलेलीं बातमीपत्रें, अहवाल, प्रवासवृत्तें, चरित्रें वगैरे पुष्कळ सामग्री इंग्रजी, फ्रेंच, डच, आणि पोर्तुगीझ भाषांत लिहिलेली विपुल अशी उपलब्ध आहे. एका शिवाजीशीं संबंध असलेली इंग्रजी सामग्री एक हजार छापील पानें प्रसिद्ध झालेली आहे. डच सामग्री पुष्कळच आहे. डचांनीं तीस खंड छापले तरी आपल्या कामाला उपयोगी अशी सामग्री केवळ अफाट असून बहुतांशीं अप्रसिद्ध आहे. समकालीन असली तरीहि त्यांत बाजार बातम्यांचाहि समावेश आहे.

हें सर्व साहित्य अभ्यासावें, त्यांतून तारखा, वेळा इत्यादि सर्व तपशील ठरवावे, सर्व घोटाळे, गडबडी वगैरे गुंतावळ प्रमाणदंड लावून आपल्या बुद्धिकौशल्यानें आणि तारतम्यानें उकलून सोडवावी, आख्यायिका, भाकड-कथा, दैवी हवाले यांचा सर्व संदर्भ ध्यानीं घेऊन त्यांत गुंतून न जातां, घटनांचा विशुद्ध सांगाडा तयार करावा म्हणजे मगच तो उद्बोधक विवेचनाच्या कारणीं लावतां येतो.

तानाजी काय, बाजी प्रभु काय किंवा शिवाजी काय यांचीं सत्य चरित्रें रचिण्यास हा सर्व खटाटोप अवश्य आहे. शिवाजीच्या काळीं जी अपूर्व क्रांति घडून आली तिला अनेक पैलू होते. ज्याला प्रतिशिवाजी म्हणत तो शिवाजीचा सेनापति नेताजी पालकर किंवा तसाच पराक्रमी मोरोपंत पिंगळे, अथवा मुत्सद्दी मंडळांत मोरोपंत, सोनोपंत, बाळाजी प्रभु वगैरे अनेकांच्या कार्याचें नुसतें सूत्रचालन नव्हे तर पुढारीपण आपल्या अंगेजणीनें करणारा शिवाजी मनासमोर उभा केला तर त्या महापुरुषाचा अलौकिक आविष्कार आपल्याला आकळितां येईल. खरोखरच शिवाजीनें "केवळ नूतन सृष्टीच निर्माण केली!" हे अमात्य रामचंद्रपंताचे शब्द अत्यंत यथार्थ आहेत.

शेंकडों दिव्य प्रसंग घडले, प्राणाहुति खर्ची पडल्या तेव्हांच ही ‘ नूतन सृष्टि ’ निर्माण होऊं शकली. अशा दिव्य प्रसंगांपैकींच एकाशीं बाजी प्रभूचें नांव चिर-निगडित झालें हें त्याचें केवढें भाग्य !

पुणें-भोर-महाड या मार्गावर हिरडोशी नदी लागते त्या लगतचें मावळ तें हिरडस मावळ. या हिरडस मावळाचे देशमुख बांदल आडनांवाचे शूर घराणें आणि तेथलेच देशकुळकरणी प्रभु घराणें. तलवार आणि लेखणी दोन्हींच्या कामांत नाणावलेल्या या प्रभु देशकुळकरणी–देशपांडे घराण्यांत बाजीचा जन्म झाला. या घराण्यांतील सनदापत्रांच्या आधारें श्री. बाळकृष्ण सखाराम कुळकर्णी यांनीं इ. स. १९२५ त ‘ वीररत्न बाजी प्रभु देशपांडे ’ यांचें एक सुरस चरित्र प्रसिद्ध केलें. तें सर्वांनीं अवश्य वाचावें. त्यांत जुने कागदपत्र छापले असल्यानें त्याचा आधार घ्यावाच लागणार.

परंतु शिवकालीन प्रसंगांविषयीं अत्यंत महत्त्वाची अशी पुष्कळच सामग्री १९२५ नंतर प्रसिद्ध झाली आणि तो क्रम पुढेंहि चालू आहे. गेल्याच आठवड्यांत श्री. आवळसकर यांनीं शिवाजीनें व्यंकोजीस लिहिलेल्या एका अत्यंत महत्त्वाच्या नवीन पत्राची नक्कल सादर केली; आणि श्री. ग. ह. खरे यांनीं वटमुरीकर देसाई यांचेकडील शिवाजी-संभाजी-राजारामकालीन अस्सल कागदपत्रें-नेरलीकरांकडून मिळवून आणलेलीं-प्रकाशित होतील. अशा नवीन माहितीच्या आधारें जुनीं चरित्रें पुनः नव्यानें अभ्यास करून लिहिलीं पाहिजेत. हें विशेष परिश्रमाचें काम योग्य प्रकारें पार पाडण्यास वर सुचविल्याप्रमाणें दीर्घोद्योगाची आवश्यकता आहे.

शिवाजीमहाराज हे पन्हाळगडावर चैत्र शु. १।१५८२ रोजीं आले; थोड्याच दिवसांत सिद्दी जोहर सलाबतखान यानें किल्ल्यास वेढा दिला, शिवाजीमहाराज पन्हाळ्यांतून निसटून आषाढ व. १।१५८२ या दिवशीं विशाळगडीं पोंचले, एवढ्या घटना आज निश्चित समजण्यास चिंता नाहीं. चैत्र, वैशाख, अधिक आणि निज ज्येष्ठ व आषाढ अर्धा एवढे साडेचार महिने महाराज वेढ्यांत अडकून पडले होते. या काळांतील वेढ्यासंबंधाच्या आणि बाहेरील हालचालींबद्दल समकालीनांनीं वर्णिलेल्या घटनांत विपुल माहिती आहे. पण त्यांच्यांत सर्वच बाबतींत एकमेळ नाहीं. त्यांची प्रदीर्घ चर्चा आणि त्यांच्या संगतीचा प्रयत्न ‘ शिवचरित्र-निबंधावलि ’ मध्यें श्री.

दिनकरपंत काळे आणि शिवभारताचे प्रस्तावना-प्रबंधकार कै. दत्तोपंत आपटे यांच्यापासून तों शिवाजीच्या जुन्या व नव्या चरित्रकारांपर्यंत सर्वांनीं आपापल्यापरीनें बारकाईनें केलेला आहे. कोणी गंगाधर वकिलाची गोष्ट किंवा शिवाजी न्हाव्याची गोष्ट ही इच साधनांत आढळणारी हकीकत मान्य करितात, कुणी बाजी तोफ ऐकल्यावर पुढें लढत राहिला व मग पडला हें एक्याण्णव कलमींतील कथन प्रशस्त समजतात; कुणी हेरांनीं गुप्तपणें शोधलेल्या वाटेनें शिद्दीसेनेला चकवून शिवाजी निसटला अशी संगति पसंत करतात, कोणी सिद्दी जोहार मिलाफींत होता हें वृत्त स्वीकारून ग्रंथ लावतात, तर जदुनाथ सरकारासारखे इतिहासकार कांहीं हें, कांहीं तें घेऊन आपली बखर सजवितात. असो, हीं सर्व विवेचनें जिज्ञासूंनीं अवश्य अभ्यासावीत.

बांदल-देशमुखांकडील निवडक वीरांचा प्रमुख म्हणून बाजी प्रभु देशकुळकरणी पन्हाळ्याहून महाराज निसटले तेव्हां शिवाजीमहाराजांसमवेत होता आणि त्या वेळीं झालेल्या युद्धप्रसंगांत तो ठार झाला हें सिद्धच आहे. आषाढ व. १ लाच हा प्रसंग घडला नसेल तर आषाढ व. २ ला तो घडला असें म्हणण्यास अवकाश आहे आणि रा. बा. स. कुळकर्णी यांनीं आषाढ व. २, १४ जुलै हीच मिति ग्राह्य केली आहे; पण एवढा एक दिवसाचाच संशय राहील. कदाचित् आषाढ व. २ ग्राह्य करणें आजहि अधिक प्रशस्त ठरेल. मग शिवाजीप्रयाण कोणी आषाढ शु. १५ ला धरतात, त्या ऐवजीं आषाढ व. १ ला धरावें लागेल. म्हणजे निघतांना तरी अंधार होता हें जें डच पत्रांत वगैरे वर्णन आहे आणि जें युक्तीलाहि जुळतें, तेंच स्वीकारल्या-सारखें होईल.

शिवाजीमहाराज गुपचुप गुप्त वाटेनें पळून गेले असें पुष्कळ जण लिहितात. पण निदान १०००* खंदे वीर व इतर साहित्य, खजिना वगैरे घेऊन शिवाजीमहाराज गेले एवढें मान्य न केलें तरी बरोबर मोठा जमाव होता एवढें तरी कबूल करावेंच लागेल. एवढ्या मंडळींनिशीं पक्क्या वेढ्यांतून एकाच वेळीं 'गुपचुप' कसें निसटतां येईल ?

* चारशें, सहाशेंपासून चार हजार, चाळीस हजार असे भिन्न आंकडे मिळतात डच १००० सांगतात.

भवानीच्या कृपेनें शत्रूला मोहित केलें असें शिवभारतकारानें लिहिलें असलें तरी हीं भवानीचीं स्वप्नें आणि कृपा शिवाजीवर सदैवच होतीं. तीं असूनहि त्याला नाना युक्त्या योजाव्या लागत. शिवभारतकारानें मोहाचें आवरण वाचकांना घातलें असलें तरी ' भित्वैनं विद्विषद्व्यूहम् ' ( अ. २६।६५ ) किंवा पुनः ' बलिनं बर्बरव्यूहं सद्यो भित्वा विनिर्गते ' ( अ. २८।१४ ) अशीं स्पष्ट विधानें केलीं आहेत. तीं ' मोरचा रात्रीं मारून चालले ' या एक्याणव कलमींतील कथनाला बळकटी आणतात. ' फाजलखानाचा मोरचा मारून ' असें प्र. र. मा. तील स्पष्टीकरणहि या मुद्याला परिपोषक नवा तपशील देतें.

बाजी प्रभु घराण्यांतील कागदपत्रांत गजापुरीं बाजी प्रभु युद्धांत पडल्याचा निर्देश आढळतो. बाजींनीं या कठिण प्रसंगांत शर्तीची तरवार केली म्हणून जेधे देशमुखांना तरवारीचें मानाचें पान महाराजांनीं दिलें होतें तो मान जेध्यांच्या संमतीनें महाराजांनीं आतां बांदलांना बहाल केला असें जेध्यांच्या शकावलींत दिलें आहे. एके काळीं जेधे बांदल वैरी होते आणि मानाचे झगडे त्या काळीं किती जिद्दीनें लढले जात हें जुन्या कागदपत्रांवरून ध्यानांत घेतलें म्हणजे बाजींच्या पराक्रमाची निराळी तारीफ नको. अलीकडील काळांत इंग्रजांच्या व्हिक्टोरिया क्रॉस्ची किंवा स्वतंत्र भारताच्या लष्करी मंडळांत परमवीरचक्राची जी सर्वोच्च योग्यता मानली जाते त्या तोलाचा मान बाजी प्रभूंनीं वर सांगितल्याप्रमाणें शिवाजीमहाराजांसारख्या अद्वितीय वीराग्रणी धन्याकडून मरणोत्तर मिळवून दिला ! ! बाजी प्रभु ' सूर्यमंडळ भेदून गेले ! ' आणि त्यांनीं कीर्तिचंद्र बळेंच ओढून आपल्या कपाळावर शंकराप्रमाणें शोभविला ! ही अतिशयोक्ति नाहीं.

अशा वीरमणीचा पराक्रम मुक्यालाहि वाचा फोडील ! बाजींचें गुणगान केवळ इतिहासकारांचा विषय राहिलेला नाहीं. तो त्यांचा, कविजनांचा, समस्त गुणपूजकांचा विषय होऊन राहिला आहे. शत्रुमित्रांच्या मर्यादा ओलांडून, वर्णजाति किंवा देशकाल यांचीं कुंपणें तोडून बाजीच्या पराक्रमाचा ध्वज अखिल मानवमंडळावर फडकत राहणारा ठरला आहे ! धन्य आहे त्या वीराची ! !

असें आहे म्हणूनच इतिहासाच्या खटपटींत नसतांनाहि श्री. मा. द्वा. कारखाननीस यांना बाजींचें प्रस्तुतचें छोटें चरित्र लिहून प्रसिद्ध करण्याची स्फूर्ति झाली! यासाठींच बाजींच्या पराक्रमभूमीचें त्यांनीं दर्शन घेतलें, तीं तीं स्थळें छायाचित्रांकित केलीं आणि हें चरित्र लिहिण्याचा उद्योग केला. इतिहासचर्चेंतल्या शंका आणि समाधानें यांचा खटाटोप करण्याच्या कटकटींत श्री. कारखाननीसांना पडावयाचें नव्हतें. तो त्यांचा मार्गहि नव्हे. तसा त्यांचा दावाहि नाहीं. एक आबालसुबोध लहानसें बाजीचरित्र सादर करावें एवढीच त्यांची भूमिका आहे आणि ती त्यांनीं चांगल्या प्रकारें पार पाडली आहे. बाजींच्या त्रिशतसांवत्सरिक उत्सवप्रसंगाला ती उचित आणि उपयुक्त ठरेल.

कोल्हापूरचे विद्वान् इतिहासकार कै. प्रि. डॉ. बालकृष्ण यांनीं आपल्या विस्तृत इंग्रजी शिवचरित्रांत डच सामग्री मिळवून दिली आणि त्यालगतच बाजीभूमीचीं चित्रेंहि प्रसिद्ध केलीं. आज श्री. कारखाननीस यांनींहि बाजी-भूमीचें चित्रदर्शन या पुस्तकांत घडविलें आहे.

बाजीच्या पराक्रमाचें लष्करी मर्म उलगडून सांगण्याचा अधिकार कै. कॅप्टन मोडकांसारख्या युद्धशास्त्रविशारदांचा आहे. मोडकांनीं प्रतापगडचें युद्ध लिहून अफजलप्रसंगाची यौद्धिक मांडणी दाखविली. त्यांनीं विशाळ-गडचा प्रदेश न्याहाळून, ऐतिहासिक साहित्य अभ्यासून, शिवाजीचरित्रांतील विशाळगडपर्वाचींहि टांचणें-टिपणें, नकाशासुद्धां कच्चीं तयार केलेलीं आहेत. परंतु त्यांचा उपयोग करून त्यांची लष्करी दृष्टिकोनांतून जुळणी करणारा अभ्यासी लष्करी पंडित अद्यापि पुढें आला नाहीं, हें एक दुर्दैवच समजलें पाहिजे. आमच्या लष्करी शाळांतून भारताचा यथार्थ इतिहास भारतीय वीरांनीं कसून अभ्यास करून स्वतंत्र प्रज्ञेनें तयार केला पाहिजे. शिवाजीचा अद्भुत वीरविलास ज्यांच्या डोळ्यांसमोर घडत होता, ते भारतांत आलेले आणि शिवाजीला भेटलेले कित्येक पाश्चात्य शिवाजीच्या पराक्रमामुळें शिकंदर–सीझरांच्या आठवणी काढून त्याला त्यांच्या पंक्तींत बसवून आश्च-र्यानें तोंडांत बोटें घालीत असतांना दिसतात.

शिवाजीचा पराक्रम घडत असतां तानाजी–बाजींसारख्या शेंकडों वीरांच्या आहुति पडल्या ! विस्मरणाच्या तमस्तोमांत त्यांतला एखादाच बाजी, एखादाच तानाजी आमच्या डोळ्यांसमोर अद्यापिहि लुकलुकतांना दिसतो ! ही लुकलुक जाग्रत ठेवण्याचा श्री. कारखाननीस यांचा एक प्रयत्न आहे. त्याचा सर्वांनीं प्रेमानें स्वीकार केला पाहिजे.

सौर आषाढ १० । ८२
पुणें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २८७१० वि: चारित्र
क्रमांक ९७८ दि. १८-१२-८

# निवेदन

वीररत्न बाजी प्रभु देशपांडे यांच्या आगामी ३०० व्या पुण्यतिथीच्या निमित्तानें त्यांचेसंबंधीं हें पुस्तक लिहून या थोर पुरुषाची सेवा करण्याचा सुयोग लाभला आहे. त्याची पूर्वतयारी म्हणून मीं पन्हाळा, पावनखिंड, विशाळगड वगैरे भागांत हिंडून बाजी प्रभूच्या व शिवछत्रपतींच्या या भागांतील घडामोडींचा संशोधनात्मक मागोवा घेत हिंडतांना माझे कोल्हापूर येथील मित्र बॅरिस्टर पारसनवीस यांचे मला वेळोवेळीं आपुलकीचें साहाय्य झालें आहे. माझ्या या सफरींत त्यांनीं जातीनें भाग घेतला. इतकेंच नव्हे तर त्या भागांतील माहीतगार मंडळीहि बरोबर दिली.

बाजी प्रभूंचें खाजगी जीवन समजण्यास पुरेशीं साधनें उपलब्ध नाहींत. बाजी प्रभूंचे एक ७३ वर्षे वयाचे वंशज, श्रीयुत नीळकंठ बाबाजी देशपांडे (प्रधान) हे भोर तालुक्यांतील आळंदे येथें शेतीवाडी करून राहतात. त्यांस त्यांच्या गांवीं जाऊन भेटलों. तेव्हां त्यांचेकडून समजलें कीं त्यांचे-जवळ असलेले महत्त्वाचे ऐतिहासिक कागदपत्र, त्यांनीं कांहीं वर्षांपूर्वीं, कै. बाबासाहेब देशपांडे—हे एक जुने पोलीस अधिकारी व मराठ्यांच्या इतिहासाचे अभ्यासू गृहस्थ होते, त्यांचे हवालीं केले. पुढें त्या कागदपत्रांचें काय झालें हें श्रीयुत नीळकंठराव देशपांडे यांसहि माहीत नाहीं, असें दिसतें. श्री. नीळकंठरावांनीं मला जे जुने कागदपत्र दाखविले ते फाटून जाळी झालेल्या, कसरींनीं खाल्लेल्या स्थितींतले कुचकामी झालेले असे आढळून आले !

पुस्तक लिहितांना, या विषयासंबंधीं वाचन करीत असतांना पावन-खिंडीच्या घटनेचा व शिवछत्रपतींच्या सुखरूप उपस्थितीचा ज्या विशाळ-गडाशीं संबंध पोहोंचतो, त्याच इतिहास-प्रसिद्ध विशाळगडाशीं कारखानिशी, सबनिशी व पोतदारी अशा निरनिराळ्या अधिकारांच्या नात्यानें म. म. दत्तोपंत पोतदार यांच्या घराण्याचा निकटवर्ति संबंध पोहोंचत असल्याचें मला आढळलें. हा एक मजेदार योगायोगच म्हणावयाचा ! साहजीकच त्याच विषयाशीं संबंधित अशा या पुस्तकाला त्यांच्याच प्रस्तावनेची जोड

देतां येईल तर काय बहार होईल, असा विचार मनांत आला. या विचाराला मूर्त स्वरूप देण्याचे इराद्यानें त्यांना भेटून तशी विनंति केली. त्यांनींहि माझ्या या अल्पशा प्रयत्नाकडे कौतुकानें पाहून कांहीं रास्त सूचना करून आणि विद्वत्ताप्रचुर विस्तृत व मार्मिक प्रस्तावना लिहून मला उपकृत केलें आहे.

कु. माधवी बकुल बढे व कु. सुप्रभा शहापूरकर या विद्यार्थिनींनीं हस्तलिखिताच्या प्रती सुबक व सुवाच्य अक्षरांत वेळेवर काढून दिल्यानें फार मदत झाली आहे. तसेंच माहीमच्या ओरिएंट हायस्कूलच्या हेडमास्तरांनीं मला एक महत्त्वाचें पुस्तक वाचावयास दिल्यामुळें त्याचा फार उपयोग झाला यांत शंका नाहीं.

दादरचे श्री. ज. आ. देशपांडे व श्रीयुत आर. के. वैद्य यांच्या प्रोत्साहनामुळें व वारंवार केलेल्या सूचनांमुळें पुस्तक लिहिण्याचें काम झपाट्यानें उरकतां आलें.

माझे मित्र श्री. प्र. म. फणसे, A. R. P. S. ( London), एक आंतरराष्ट्रीय किर्तीचे छायाचित्रकार, मुंबई सरकारच्या फोटो झिंको प्रेसमधील माजी हेड फोटोग्राफर व प्रोसेस एनग्रेव्हिंग तज्ज्ञ यांनीं पुस्तक-प्रसिद्धीच्या वेळीं केलेल्या मार्गदर्शनाचा लाभ मिळाला हें नमूद केल्याशिवाय राहवत नाहीं.

त्याचप्रमाणें माझे चुलत बंधु श्री. मधुकर कारखानीस ( आर्टिस्ट व ड्राफ्टस्मन) यांनीं काळजीपूर्वक नकाशा काढून दिला आहे, हेंहि नमूद करणें मी माझें कर्तव्य समजतों. 'साधना प्रेस' चे व्यवस्थापक श्री. चिं. ग. वझे यांनीं छपाई व पुस्तकाची एकंदर सजावट व्यवस्थित व वेळेवर करवून देण्यांत दक्षता दाखविल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहें.

शेवटीं स्वतंत्र भारतांतील नुकत्याच स्वतंत्र झालेल्या नवमहाराष्ट्रांत तेजस्वी बाजींच्या ३०० व्या पुण्यस्मरण समयाला या पुस्तकाच्या रूपानें त्या थोर पुरुषाची यथामति सेवा करण्याचा सुयोग लाभला हें मी माझें भाग्य समजतों ! !

माधव द्वारकानाथ कारखानीस.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | माझा महाराष्ट्र ... ... | १ |
| २ | महाराष्ट्र आणि शिवछत्रपति ... | २ |
| ३ | पारखलेलीं रत्नें ... ... | ५ |
| ४ | एक अमोलिक रत्न सांपडलें! ... | ६ |
| ५ | बाजी प्रभूंची थोर परंपरा व कर्तबगारी | ८ |
| ६ | पन्हाळ्याचा वेढा ... ... | १२ |
| ७ | आणखी एक गंडांतर ... ... | १५ |
| ८ | पेंचप्रसंग ... ... | १८ |
| ९ | ती रात्र आणि तो दिवस... ... | २१ |
| १० | वंशपरंपरागत मानमान्यता .... | ३३ |
| ११ | बाजी प्रभु व लिऑनिडस् .... | ३५ |
| १२ | बाजी प्रभूंचें स्मारक ... | ३६ |
| १३ | स्थित्यंतरें (पन्हाळा, पावनखिंड व विशाळगड) | ३८ |


* * *

# १. माझा महाराष्ट्र

ज्या महाराष्ट्रांत शिवछत्रपतींनीं स्वराज्य स्थापन केलें त्याचें नैसर्गिक स्वरूप स्वतंत्रतेला, स्वसंरक्षणाला व स्वराज्याला पोषक असेंच आहे.

उत्तरेकडील आक्रमकांच्या वाटेंत विंध्याद्रि व सातपुडा आडवा पडला आहे, पश्चिमेस पश्चिम समुद्र सह्याद्रीचा पायथा धूत आहे. किनाऱ्याला मुंबई, अलीबाग, जंजिरा, मालवण, सुवर्णदुर्ग, रत्नागिरी, विजयादुर्ग, कारवार इत्यादि सुंदर व उपयुक्त बंदरें आहेत; याच समुद्राशेजारून आकराशें मैल लांबीचा व सरासरी तीन हजार फूट उंचीचा कृष्ण प्रस्तरीय टणक, काळाशार सह्यगिरि महाराष्ट्राच्या पाठीशीं उभा आहे. समुद्र व सह्याद्रि यांमधील ती लालमातीची ताड-माड, नारळी, फोफळी, आंबा, काजू यांची व भातशेतीची कोंकणपट्टी; ह्या सह्यगिरीच्या कुशींतून ताठ वर मान करणारे ते कोटकिल्ले; डोंगर पठारावरचा तो सुपीक काळ्या मातीचा घाटमाथा व त्यावरून धांवणारे ते भीमा, नीरा, कृष्णा इत्यादि पवित्र नद्यांचे जलप्रवाह असा हा आमचा कणखर महाराष्ट्र देश गरीबींतल्या स्वाभिमानाच्या सौंदर्यानें नटलेला नि स्वतंत्रतेला आवाहन देणारा! याचें एकंदर क्षेत्रफळ एक लक्ष चौरस मैल असून लोकसंख्या साडेतीन कोटी आहे.

चालुक्यवंशीय रविकीर्ति राजानें सतराव्या शतकांत शिलालेखांत चिरंजीव करून ठेवला तो हाच महाराष्ट्र! कोंकणांतील मौर्यांवर मात करणारा महापराक्रमी पुलकेशी तळपला तो ह्याच महाराष्ट्रांत. अजिंठा येथील चित्रांत इराणचा वकील भेट देतांना दिसतो तो हाच पुलकेशी. उत्तरेकडील आर्यांनीं वसाहत करून दंडकारण्याला रंग-

रूपास आणिलें तें येथेंच. कैलास लेण्याची महाराष्ट्राला अप्रतिम देणगी देणारा राष्ट्रकूटवंशीय दैदीप्यमान कृष्णराज चमकला तो येथेंच. बाराव्या शतकाच्या अखेरीस यादवांनीं स्वतंत्र बाण्यानें डोकें वर काढलें तें याच भूमींत. ज्ञानेश्वराच्या मायबोलीनें अमृताशीं पैजा जिंकल्या त्या याच पवित्र देशांत. नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास यांची संतवाणी घुमली ती याच प्रसिद्ध स्थळीं आणि सतराव्या शतकांत शिवछत्रपतींसारखा कर्तृत्ववान् राष्ट्रपुरुष जन्मला तो याच मायभूमीचे पांग फेडण्यासाठीं आणि अनेक स्वार्थत्यागी राष्ट्रवीर ज्या महाराष्ट्रांत निर्माण होत आले तो हाच महाराष्ट्र.

* * *

## २. महाराष्ट्र आणि शिवछत्रपति

अशा या महाराष्ट्राचें उत्तर-भारत व दक्षिण-भारत यांमधलें स्थान ऐतिहासिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचें असून याच मराठी मायबोलीच्या महान् देशांत आपल्या कर्तृत्वाला भरपूर वाव आहे हें श्रीछत्रपति शिवाजीमहाराजांनीं ओळखलें. उच्च हिंदु संस्कृतीवर आधारलेलें, गोरगरिबांच्या तोंडांत सुखाचे दोन घांस घालील, त्यांना चिरकाल आसरा देईल, त्यांना स्वाभिमानी जिणें जगण्यास मदत करील, आपल्या वडिलांच्या जहागिरीच्या केंद्रबिंदूतून विस्फारित होत जाईल असें स्वतंत्र बाण्याचें राज्य महाराष्ट्रांतच निर्माण करतां येईल व तेंहि किल्ल्यांच्या व मावळी लोकांच्या साहाय्यानेंच ही जाण प्रथम शिवाजीसच झाली ! " आमच्या या कठीण प्रदेशांत नुसता कल्पनेचा घोडासुद्धां नाचविणें कठीण आहे. आमचा प्रदेश अवघड व डोंगराळ

आहे. त्यांतून नदीनाले उतरून जाण्यास वाट नाहीं." हें खुद्द महाराजांचेच उद्गार आहेत. सह्याद्रीच्या कडेकपाऱ्यांतून व दऱ्याखोऱ्यांतून स्वतः हिंडून प्रत्यक्ष मिळालेल्या अनुभवाचे हे बोल आहेत. किल्ल्यांचें महत्त्व महाराजांच्याच शब्दांत मांडावयाचें तर तें असें :—

"जैसा कुळंबी माळा घालून शेत राखतो, तसे किल्ले रक्षण आहेत....राज्यास बळकटी किल्ल्यांची आहे....आपणांस धर्म-स्थापना व राज्यसंपादन करणें, शत्रुप्रवेश न होणें हें किल्ल्यांमुळें होतें. दिल्लींद्रासारखा शत्रु उरावर आहे. तो आला तरी नवे जुने तीनशेंसाठ किल्ले हजरतीस आहेत. एक एक किल्ला एक एक वर्ष लढला तरी तीनशें साठ वर्षे पाहिजेत." अशा या किल्ल्यांच्या साहाय्यानें गनिमी रणतंत्राचा उपयोग करून आपणांपेक्षां संख्येनें व शस्त्रास्त्रानें अधिक बलवान् अशा शत्रूंशीं यशस्वी सामना देऊन महाराष्ट्रांत शिवाजीमहाराजांनीं स्वराज्य स्थापन केलें.

ही गनिमी काव्याची कल्पना या विद्येंत निष्णात अशा आपल्या पूज्य पिताजींकडून त्यांनीं उचलली असली तरी शिवाजीमहाराज कल्पक व स्वयंप्रकाशी असल्यानें वेळप्रसंगीं या युद्धतंत्रांत समयोचित फेरफार करण्यांत ते सिद्धहस्त होते हें विसरून चालणार नाहीं. नाहीं तरी प्रवासांत बरोबर दिलेली शिदोरी व पढवलेली विद्या कितीशी उपयोगी पडते ?

महात्मा गांधींनीं ज्याप्रमाणें निःशस्त्र भारती प्रजेला सत्याग्रहाचा महामंत्र देऊन, शस्त्रधारी प्रबल इंग्रज सेनेशीं लढून ताठ मानेनें उभें राहावयास व स्वदेश स्वतंत्र करण्यास शिकविलें, तसेंच शिवाजीनें पण महाराष्ट्राच्या नैसर्गिक परिस्थितीला अनुकूल असा, सामर्थ्यसंपन्न शत्रूला हतबल करणारा, अनाडी मावळ्यांपासून ते कसलेल्या सेना,

नायकालाहि सारखाच उपयुक्त असा हा मंत्र महाराष्ट्रीयांसच काय, पण आम् भारतीयांस देऊन, त्यांच्या क्षात्रवृत्तीला आव्हान दिलें. या तंत्राचा अभिनवपणा त्याच्या वापरांत होता. त्याचा आविष्कार काळ वेळ पाहून कसा करावा, शत्रूला दाणावैरण मिळूं न देतां त्याची आघाडी-पिछाडी व दोन्ही बगला अचानक छाप्यानें झोडपून कशा काढाव्यात व तितक्याच चपलतेनें सहीसलामत निसटून कसें जावें हें शास्त्र शिवाजीनेंच शिकविलें. इतकें सर्व सांगण्याचें कारण बाजी प्रभूंनींसुद्धां याच रणतंत्राचा कुशल वापर पावनखिंडींत कसा केला तें आपणांस पाहावयाचें आहे. तो प्रसंग पुढें ओघानें येईलच. अर्थात् बाजी प्रभू हे शत्रुपक्षाकडून शिवाजीला येऊन मिळण्यापूर्वी त्यांनीं आपलें लढाईचें कसब महाराजांस दाखवून त्यांजकडून धन्यता मिळविली होती. त्यामुळें याआधींच या युद्धपद्धतींत तयार अशा योध्याला महाराजांचे छत्राखालीं आल्यावर त्यांच्या सान्निध्यामुळें अधिकस्य अधिकं फलं म्हणून आपल्या ज्ञानांत भर घालावयास मिळाली असणें शक्य आहे.

आपल्या जहागिरीभोंवतींचे मोक्याचे किल्ले व लगतचा प्रदेश युक्तीयुक्तीनें पदरांत पाडून घ्यावयाचा तर किल्ल्यांच्या अवघड वाटांतून चलाखपणें हालचाली करणारे, गनिमी पद्धतीच्या लढाईला योग्य असे मावळे लोकच प्रथमपासून शिवाजीमहाराजांनीं हाताशीं धरून त्यांना या युद्धपद्धतींत निष्णात केलें. “तान्हाजी मालुसरे, येसाजी कंक, सूर्याजी काकडे, शिवाय बाजी जेधे, सोनोपंत डबिरांचा मुलगा त्रंबक सोनदेव, बापूजी मुद्गल, देशपांड्यांचीं मुलें—नारोबा, चिमणाजी व बाळाजी, रोहिड खोऱ्याच्या नरसप्रभु गुप्ते यांचा मुलगा दादाजी” वगैरे सळसळत्या रक्ताचे तरुणबांड जवान निरखून-पारखून महाराजांनीं आपल्या झेंड्याखालीं गोळा केले.

नेताजी पालकरसारखा ‘प्रति शिवाजी’ म्हणून गाजलेला सेनानायक महाराजांचे हाताखालींच गनिमी युद्धकलेंत तरबेज झाला व संभाजीच्या वधानंतर औरंगजेबाशीं प्रदीर्घ सामना देऊन त्याला हतबल करून महाराष्ट्राच्या मातींत मातीस मिळविणारे संताजी घोरपडे, धनाजी जाधव, मोरोपंत पेशवे, रामचंद्रपंत आमात्य, खंडो बल्लाळ वगैरे कसबी धुरीणांनीं जो गनिमी युद्धकलेचा कुशल वापर या वेळीं करून दाखविला ते शिवाजीमहाराजांच्या उत्तर राजवटींत त्यांच्याच तालमींत तयार झालेले होते. तेव्हां शिवकालीन स्वराज्याचा उदय व अस्त यांमधील काळांत महाराजांनीं आणखी कोणतीं नररत्नें पैदा केलीं तें पाहूं या.

* * *

## ३. पारखलेलीं रत्नें

शिवाजीमहाराजांनीं स्वराज्याची उभारणी करतांना आरंभापासूनच कशी निवडक मंडळी जवळ केली हें आपण पाहिलेंच आहे. यानंतरच्या काळांतहि अशाच प्रकारचीं मौल्यवान् रत्नें त्यांनीं पैदा केलीं. योग्य माणसें हेरण्यांत त्यांची शोधक दृष्टि फार तरबेज होती. आणि ती मिळविल्यानंतर त्यांचा त्यांच्या योग्यतेनुरूप कोठें कसा वापर करावयाचा हें ते चांगलें जाणत होते. राजापूरच्या स्वारींत महाराजांनीं बाळाजी आवजी चिटणीस हें मौलिक रत्न पैदा केलें. हा पुढें महाराजांच्या विश्वासांतला मोठा उपयुक्त असा मुत्सद्दी म्हणून प्रसिद्धीस आला. चाकणच्या मोहिमेंत त्यांस फिरंगाजी नरसाळा हातीं लागला. जावळी प्रकरणांत मुरारबाजीसारखा लढ-

वघ्या मिळवितां आला व रोहिडा किल्ल्यावरील स्वारींत बाजी प्रभु-सारखें अप्रतिम वीररत्न त्यांनीं पदरीं पाडून घेतलें. अशा प्रकारचीं मौल्यवान अस्सल रत्नें महाराजांच्या पदरीं होतीं म्हणूनच स्वराज्याच्या इमारतीचे चिरे सांधून ही इमारत दृढ पायावर उभारतां आली यांत शंका नाहीं. हें रत्न त्यांनीं कसें मिळविलें तें आतां पाहूं या.

* * *

## ४. एक अमोलिक रत्न सांपडलें !

शहाजी राजे यांनीं दादोजी कोंडदेव व अनंत प्रभु फणसे या दोन जमाबंदीच्या कामकाजांत निष्णात अशा हुशार मुत्सद्यांमार्फत मावळांतील आपल्या जहागिरीच्या वसुलाची पद्धत सुधारून व तेथील तंटेबखेडे मोडून त्या प्रजेस सुखी केलें. *

परंतु मावळांतील बांदल देशमुख हा मात्र भलताच शिरजोर होऊन बसला होता. तो कोणास आवरेना. तो त्या भागांतील वतन-दाराशीं कुरापती काढी व स्वतःस बारा मावळचा राजा म्हणवी. यामुळें कित्येक वतनदार त्याच्या या दंडेलीस कंटाळून परदेशाची

---

* शके १५७१ मध्यें सातारा व परळी या दोन किल्ल्यांवर सुभेदार म्हणून नेमला गेलेला व पुढें औरंगजेबाशीं दोन हात करतांना प्रसिद्धि पावलेला प्रयागजी अनंत फणसे हा या अनंत प्रभू फणसेंचा मुलगा असावा. या पनवेलकर फणसे घराण्यानें मराठेशाहीला मोठीं मोलाचीं व मातबर माणसें वेळोवेळीं पुरविलीं आहेत. गायकवाड सरकारचे दिवाण बाबाजी आप्पाजी व रावजी आप्पाजी फणसे ( १७९३–१८०३ ) हे मोठे कर्तबगार व प्रसिद्ध पुरुष झाले.

वाट चालूं लागले. ही त्याची दंडेली शिवाजीमहाराजांनीं पुढें चांगलीच जिरविली.

शिवाजीमहाराजांनीं स्वराज्याच्या मोहिमेला सुरुवात करून तिला आकार दिला. इ. स. १६४७ मध्यें त्यांनीं कोंडाणा किल्ला सर केला. लगेच पुढच्या वर्षीं तोरणा घेऊन स्वराज्याचें तोरण बांधलें. पाठोपाठ चाकण, रायगड युक्तीनें घेऊन इ. स. १६५४ मध्यें पुरंदरहि घेतला. नंतर जावळीच्या चंद्रराव मोऱ्यास ठार करून पश्चिम किनाऱ्यापर्यंत समुद्राला हद्द भिडवून लढाऊ जहाजें बांधण्यास सुरुवात केली. ही स्वराज्याची चढती कमान हिरडस मावळांतील बांदल देशमुखांच्या डोळ्यांत सलूं लागली. हा कृष्णाजी बांदल महाराजांचा फार द्वेष करीत असे. " ह्यावेळीं त्यांच्या ताब्यांत नीरा नदीच्या दक्षिण तीराचा मुलूख पूर्वेस शिरवळपर्यंत व दक्षिणेस कृष्णा नदीच्या उत्तरेकडील डोंगरापर्यंतचा मुलूख असून त्या सर्व प्रांताचा वसूल तो प्रतिष्ठितपणें घेत असे, तरी त्याचें वास्तव्य × × रोहिडा किल्ल्यांतच असे. " शिवाजीराजे आपल्या मुलुखावर चालून येतील व या स्वराज्याच्या चळवळींत आपला निकाल लागेल या भीतीनें त्यानें रोहिडा किल्ल्यावर नीट बंदोबस्त ठेवला होता. तो विजापूरकरांस महाराजांच्या हालचाली अंतस्थपणें कळवीत असे व शहाजीराजांची आपल्या मुलास फूस आहे असें भासवीत असे.

अखेर इ. स. १६५५ मध्यें रात्रीचे प्रहरीं महाराजांनीं या किल्ल्यावर अचानक छापा घातला. कृष्णाजी बांदल हा जरी वृद्ध होता तरी तो शौर्यानें लढला. परंतु आबाजी प्रभूचा त्याच्या वर्मीं घाव लागून तो मृत्युपंथास लागला. यावेळीं बांदलाचे दिवाण बाजी प्रभु देशपांडे यांनीं मोठया हिरीरीनें लढून आपल्या क्षात्रतेजाची चमक महाराजांचे प्रत्ययास आणून दिली. अस्सल लढवय्यालाच

असल लढवय्याची ओळख पटते. त्यांतून महाराज स्वभावतःच माणसांची पारख करण्यांत प्रसिद्ध होते. त्यांनीं ओळखलें कीं, आतां जर आपण या वीराची समजूत घालून त्याला ध्येयवादी बनविलें नाहीं तर हा स्वामिनिष्ठ सेवक जिवावर उदार होऊन लढत राहणार व त्यांत तो प्राणास मुकेल, पण शरणागति पत्करणार नाहीं. महाराजांच्या बलशाली सेनेपुढें कितीहि शौर्यानें लढा दिला तरी बाजी प्रभूंचा निभाव लागणें शक्य नव्हतें. हें समजून महाराजांनीं त्यांच्या शौर्याची तारीफ केली व त्यांस युक्तीनें आपल्या बाजूस वळवून घेतलें.

"महाराजांनीं या पाणीदार पुरुषास मावळ्याची सरदारी सांगून त्याचा इतमाम उत्तम प्रकारें वाढविला." त्यांचे बंधु फुलाजी यांसाहि आपले पदरीं आश्रय दिला व त्यांचीं पूर्वींचीं वतनें त्यांजकडे चालू ठेविलीं. अशा प्रकारें महाराजांचा शत्रु तो त्यांचा मित्र झाला. इतकेंच नव्हे तर या चाळीस वर्षांच्या बाजींच्या पराक्रमाला यापुढें स्वराज्य-सेवेंत एक नवीनच दृष्टि व क्षेत्र मिळत गेलें. हें अशा प्रकारें पैदा केलेलें अमोलिक रत्न महाराजांच्या पुढें कसें उपयोगी पडलें तें ओघानें कळून येईलच.

* * *

## ५. बाजी प्रभूंची थोर परंपरा व कर्तबगारी

ज्यानें आपल्या कर्तबगारीनें शिवकालीन इतिहास घडविण्यांत हातभार लावला त्या थोर राष्ट्रपुरुषाचा जन्मदिवस इतिहासाला अवगत नसावा ही एक आश्चर्यजनक तितकीच खेदकारक घटना आहे. खरें

म्हणजे त्यांच्या खासगी जीवनाबद्दल फारच थोडी माहिती उपलब्ध आहे. ही माहिती अशी:—

“बाजी प्रभूंचा जन्म भार्गव गोत्रांत झाला. ते भोरपासून तीन मैलांवर असलेल्या सिंध गांवीं जन्मले. त्यांचें आडनांव प्रधान होतें. तेराव्या शतकांत मुसलमानांनीं मांडवगडचें हिंदु राज्य खालसा करून तेथें आपली सत्ता प्रस्थापित केल्यावर जीं कांहीं प्रभु घराणीं दक्षिणेंत उतरलीं त्यांत **‘रघुनाथ देवराव प्रधान’** हे होते. पुढें दक्षिणेंतील राजांकडून व बहामनी राज्यकर्त्यांकडून जीं वतनें व अधिकार यांचे घराण्यास परंपरेनें प्राप्त होत गेले त्या हुद्यावरून मिळालेलीं प्रधान, देशपांडे, चिटणवीस, कारखानीस, गडकरी, कुलकर्णी, सिंधकर, विळेकर इत्यादि उपनांवें यांचे घराण्यांतून प्रचारांत आहेत.

“भोर तालुक्यांतील मावळ भागांत असलेल्या रोहिडा किल्ल्यावर शहाजीचे आश्रित व विजापूरकरांचे ताबेदार कृष्णाजी बांदल देशमुख हे किल्लेदार होते. बाजी प्रभूंचे आजे ‘पिलाजी’ व वडील ‘कृष्णाजी’ हे या बांदलांचे दिवाण म्हणून काम करीत आले. “बाजी प्रभूंच्या वडिलांनीं पराक्रमाचीं मोठमोठीं कामें केल्यामुळें बादशहातींतून ५२ गांवचा देशपांडेपणाचा व कुलकर्णीपणाचा हक्क वंशपरंपरेनें इनाम मिळाला. हीं सर्व गांवें हिरडस मावळांतील असावींत असें दिसतें.” बाजी प्रभूंचे वडील कृष्णाजी प्रभु देशपांडे हे शहाजी राजे यांचे पथकांत असतांना इ. स. १६३३ मध्यें “मोंगल सरदार शाहिस्तेखान व खानजमान यांजबरोबर लढाया मारून यानें त्यांस नामोहरम केलें होतें. अशा या थोर परंपरेंत जन्मलेले बाजी प्रभु स्वतःच्या कर्तबगारीनें पुढें येत चालले. जोरजोडी, बैठक, दांडपट्टा, भाला, बोथाटी, तलवार इत्यादि प्रकारच्या त्या काळाला योग्य अशा

शिक्षणांत ते तरबेज होते. [1] "वडिलांच्या पश्चात् बाजी प्रभु हा मोठा कर्ता पुरुष निपजला. त्यानें आपलें पूर्वार्जित वतन सांभाळून युद्ध-कलेचें परिज्ञान पण उत्तम प्रकारें मिळविलें होतें."

अशा या बाजी प्रभूंना महाराजांनीं स्वराज्याच्या कामीं कसें जोडून घेतलें तें आपण पाहिलेंच आहे. एकदां त्यांना असें आपणाकडे खेंचून घेतल्यावर त्यांचेवर वेळोवेळीं कोणतीं जोखमीचीं कामें सोंपविलीं हें पाहणें मनोरंजक तितकेंच बोधप्रद होईल. [2] "या दृष्टीनें विचार करूं लागलें तर इ. स. १६५९ मे १३ ला बाजीप्रभूला हिरडस मावळांतल्या ओस पडलेल्या एका गडाला मोहनगड असें नांव देऊन त्याची डागडुजी व बंदोबस्त करण्याचा राजांनीं दिलेला सूचक हुकूम हा त्यांनीं ठरविलेल्या या दृष्टीच्या योजनेचा अगदीं पहिला सुगावा होय. अफजलखानानें समोरासमोर युद्ध दिलें किंवा तसें देण्याचें टाळलें, तरी त्याच्या फौजा आपल्या छोट्याशा मुलुखाला केव्हां तरी घेरल्याशिवाय राहणार नाहींत, याची त्यांना खात्री होती." आणि याच धोरणी दृष्टीनें त्यांनीं वरील हुकूम बाजी प्रभूंना दिला होता. महाराजांचे या पत्राची भाषा येणेंप्रमाणें :—

[3] "मशहुरूल अनाम बाजप्रभु प्रति सिवाजी राजे....कासलोड-गड हिरडस मावळमधें आहे. तो गड ऊस पडला....याचें नांव मोहनगड ठेउनु किला वसवावा यैसा तह....तरी तुम्ही....मोहन-गड गडावरी....अळंगा मजबूद करूनु....किला मजबूद करूनु.... मग तुम्ही किलुयाखाले उतरणें मोर्तबसुद."

अफजलखानाचा वध १० नोव्हेंबर १६५९ ला झाला. त्यानंतर त्याचा मुलगा फाजलमहंमद हा आपल्या जोडीदारासह

१. प्रभुरत्नमाला. २. छत्रपति शिवाजीमहाराज (काळे), पृष्ठ ७०.
३. राजा शिवछत्रपति (पुरंदरे) भाग ४, पृष्ठ १०.

वेषांतर करून विजापुराकडे पळत सुटला. तेव्हां [1] " त्यांच्याच शोधार्थ कित्येक मराठे सरदार गेले त्यांत बाजी प्रभु हा पण होता. "

वरील घटनेनंतर म्हणजे अफजलखानाचा वध झाल्यानंतर फक्त अठराच दिवसांनीं महाराजांनीं पन्हाळा किल्ल्याला वेढा देऊन तो सर केला. या स्वारीच्या वेळीं बाजी प्रभूंनीं या कामगिरींत भाग घेतला होता. त्यावेळपासून ते पन्हाळ्याच्या मुक्कामांतील साडे तीन महिने बाजी प्रभु महाराजांसन्निध सल्लामसलत देण्यास हजर होते. एक वडीलधार मनुष्य पाठीशीं असल्यामुळें महाराजांना त्या बिकट प्रसंगांत केवढा धीर वाटला असेल! त्यांत बाजी प्रभु हे राजकारणांत मुरलेले एक अनुभवी, मुत्सद्दी व कुशल सेनानायक होते. पन्हाळ्याच्या वेढ्यांतून निसटून पावनखिंड गांठीपर्यंत मोठ्या धीराचे बाजी प्रभु महाराजांसन्निध हजर होते. पावनखिंड गाजविणाऱ्या या बाजी प्रभूच्या निस्वार्थी वृत्तीचें अत्यंत प्रभावी शब्दचित्र 'राजा शिव-छत्रपति' या पुस्तकाच्या भाग ४ मधील पान १२७ वर श्रीयुत पुरंदरे यांनीं कोरून ठेविलें आहे तें असें:—

" काय माणसें हीं! हीं माणसें महाराष्ट्राचा संसार थाटण्यासाठीं जन्माला आलीं. स्वत:च्या जिवाची यांना पर्वाच काय! यांच्या एका हातावर तुळशीपत्रें उमलत होतीं अन् दुसऱ्या हातांत निखारा फुलत होता आणि महाराजांना तीं आपल्या नि:शब्द प्रेमानें विचारीत होतीं, 'महाराज! सांगा यांतलें संसारावर, घरादारावर काय ठेवूं?'

धन्य धन्य महाराष्ट्र! धन्य महाराष्ट्राची जातकुळी! "

या पावनखिंडीच्या रोमहर्षक प्रसंगाचें सविस्तर वर्णन पुढील पानांवर येणारच आहे.

* * *

---

१. प्रभुरत्नमाला, पृष्ठ ७०.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम २८७१० वि: चरित्र
क्रमांक ९८८ नों. दि. १८.१२.८२

## ६. पन्हाळ्याचा वेढा

अफजलखानाच्या वधानंतर अवघ्या अठरा दिवसांत शिवाजीनें विजापूरकरांच्या ताब्यांतील कोल्हापूरपर्यंतच्या मुलुखावर स्वारी करून तो सर केला; थेट पन्हाळ्यावर आपला भगवा-झेंडा रोवला सुद्धां! तिकडे पिसाट सुटलेला नेताजी पालकर विजापूरच्या वेशीपर्यंत घोड-दौड मारीतच होता. आधींच खानाच्या वधानें विजापूरचा सुलतान चिडचिडलेला; दुखावलेला. फाझलखान बापाच्या वधाचा सूड घेण्यासाठीं आंतल्या आंत जळत होता, त्यांत या बेलगाम सुटलेल्या मराठी वीरांच्या विजयाच्या दुःसह बातम्या! अशा वेळीं या अनावर शिवाजीवर कोणता झुंजार महारथी पाठवावा हा सुलतानाला मोठा प्रश्न पडला. शेवटीं त्यानें मोठ्या धोरणानें सिद्दी जौहारची या कामीं निवड केली. सिद्दी हुशार होता, कसलेला सेनानायक होता आणि शिरजोरहि होता. कांट्यानें कांटा काढण्याचा हा सुलतानाचा डाव होता. हें सिद्दीचें नाकापेक्षां जड मोतीं परस्पर शिवाजीवर आदळलें तर त्याला हवेंच होतें. दोघांचा चुराडा झाला तर बहारच उडाली! परंतु विधिघटना मात्र न्यारीच होती!

'ह्या काफराला जिवंत पकडा किंवा ठार मारा' असें सुलतानाचें फर्मान सुटलें! शहाला कुर्निसात करून हा गौरविलेला सलाबत-खान प्रचंड तयारीनिशी विजापूरच्या वेशींतून बाहेर पडला. त्या वेळचा तो थाट काय विचारावा?

[1]"प्रत्येक तरतुदींत जौहर जातीनें लक्ष घालीत होता. तोफा भुई चेपीत धांवत होत्या. वैरणीच्या गंजी भरलेल्या गाड्या डगमग डोलत छावणीकडे रांग धरून चालत होत्या. हत्तींची मोठी थोरली रांग छावणीच्या तोंडावर उभी होती. तंबू, शामियाने, राहुट्या आणि

---

१. राजा छत्रपति भाग ४.

पालें तर अगणित होतीं. दारूगोळा, खजिना, शस्त्रास्त्रें, बिगार-कामगार, दाणागोटा वगैरे साराच प्रचंड पसारा होता. पस्तीस हजार तोंडांच्या फौजेला काय लागणार नाहीं ? असा हा प्रचंड तळ विजापूरबाहेर पडला. शिवाय कोंकणांतील शृंगारपूरचे राजे सूर्यराव सुर्वे, पालवणीचे जसवंतराव, सावंतवाडीचे राजे भोसले, सावंत वगैरे फौजबंद सरदार फर्मानें पाठवून बादशहानें बोलावून घेतलेच होते. कोंकणांतील सर्व शत्रु महाराजांविरुद्ध उठविण्याची तरतूदहि त्यानें केली होती."

महाराजांचा मागोवा घेत मिरजमार्गें ही सेना पन्हाळगडच्या पायथ्याशीं येऊन थडकली. महाराज पन्हाळगडावरच आहेत, याची जौहरनें आधींच खात्री करून घेतली होती. ऐसपैस तीन-चार मैलांचा चौफेर टापू शत्रूनें व्यापला. एकदम गडावर चाल करून जाण्याची मात्र जौहरची छाती झाली नाहीं. [1]"पन्हाळगडाच्या पायथ्याशीं औरसचौरस खूपच मोठी छावणी पडली. तंबू राहुट्यांची दाटी झाली. पंख पसरून बगळ्यांचा पांढरा शुभ्र थवा उतरला. चौफेर पक्का वेढा पन्हाळ्यास घालण्याकरितां जौहरनें योजना केली आणि तांतडीनें फौजांचे आणि सरदारांचे मोर्चे बसविले. थोड्याच वेळांत गडाला पूर्ण वेढा पडला. फाझलखान, बडेखान, रुस्तेमेजमान आणि स्वतः जौहर यांनीं गडाच्या पूर्व बाजूस मोर्चे दिले. सादतखान, सिद्दी, मसूद, बाजी घोरपडे आणि भाईखान यांनीं पश्चिमेकडून नाकेबंदी केली. उत्तर आणि दक्षिण बाजूंकडूनहि जौहरनें कडक वेढा ठेवला."

"विजापूरच्या राजानें पराकाष्ठेचे प्रयत्न करून १६ ते २० हजार घोडेस्वार व ३५ ते ४० हजार पायदळ जमविलें व हें सैन्य सिद्दी जौहरच्या हाताखालीं देण्यांत आलें."

---

१. राजा छत्रपति भाग ४, पृ. ५३.

चैत्र शुद्ध प्रतिपदेचा शुभ दिवस. दिनांक २ मार्च १६६० शार्वरीनाम संवत्सर आणि याच शुभ दिवसाची सुरुवात ही अशी झाली. अशुभ, भयानक रीतीची! स्वराज्यावर काळाकभिन्न जौहरच काय, पण अनेक काळेकुट्ट ढग चोहोंकडून गर्दी करूं लागले. महाराज मात्र गडावर आपल्या सहा हजार जिवास जीव देणाऱ्या सैनिकांनिशीं या साऱ्या संकटांना निश्चयानें तोंड देण्यास खडे होते. त्र्यंबक भास्कर, गंगाधरपंत, बाजी प्रभु आदि शेलकी मंडळी सेवेला हजर होतीं. महाराज जातीनें देखरेख करीत होते. नेताजी पालकर, मोरोपंत पिंगळे वगैरे सेनापतींच्याकडे शत्रूच्या पिछाडीवर छापा घालून बाहेरून वेढा उठविण्याचें काम दिलेलें होतें. खालून तोफांची सरबत्ती सुटली कीं, वरून तितक्याच जोरानें प्रतिसाद दिली जाई. [1]" जौहरचा कोणताहि मारा गडावर कारिगार होईना. महाराज अत्यंत जागरूक होते. ते शत्रूला वर सरकूंच देईनात."

जौहरच्या फौजेला कुमक मिळून ती फुगतच होती. गडावर अचूक मारा करतां यावा म्हणून जौहरनें राजापुरास निरोप पाठवून लांब पल्ल्याच्या तोफा व दारूगोळा इंग्रजांकरवी मागविला. हा अवजड तोफखाना घेऊन हेन्री रिव्हिंगटनची पलटण युनियन जॅक फडकावीत दाखल झाली! महाराजांना गडावरून हें सारें दिसत का नव्हतें? धुराचे लोट यांच्या डोळ्यांना दिसत होते अन् तोफांचा धुमधडाका त्यांच्या कानठळ्या बसवीत होता. हा प्रकार पाहून महाराज मनस्वी चिडले!

" अरे गिफर्डला मी पकडला, तेव्हां हाच हेन्री त्याला सोडा म्हणून थोड्याच दिवसांपूर्वी गयावयां करीत होता! त्यावेळीं याच

१. राजा छत्रपति भाग ४, पृ. ५३.

टोपीकरानं मला मोठ्या तोंडानं कोण भरघोस आश्वासनं दिलीं! आणि त्यावर विश्वास ठेवून मीं त्या गोऱ्या कैद्याला बंधमुक्त केलं आणि तोच आर्जवी माणूस आज माझ्यावर असा उलटला काय? ठीक आहे पाहून घेईन!" इतकेच शब्द महाराजांच्या ओठाशीं आले.

पुढें महाराजांनीं पन्हाळ्यावरून निसटल्यावर राजापुरावर स्वारी केली, तेव्हां याचं सव्याज उट्टं काढलंच. त्यांनीं इंग्रजांची वखार तर लुटलीच; शिवाय, वरती दहा बारा इंग्रजांना कोठडीची मनमुराद हवा चाखावयास कित्येक वर्षे पाठवून दिलें, त्यांत हा हेन्री होताच.

* * *

## ७. आणखी एक गंडांतर!

याच वेळीं औरंगजेबाच्या हुकुमावरून शाहिस्तेखान सत्त्याहत्तर हजार घोडदळ, तीस हजार पायदळ, प्रचंड तोफखाना घेऊन औरंगाबादेहून महाराष्ट्रावर फुंफार सुटला....

[१]" कित्येक लोक मुच्छदी वगैरे तिरंदाज, बरखंदाज, रजपूत सतीलीवाले तसेच हत्तींचा तोफखाना, उंटांचा तोफखाना, घोडियावरील तोफखाना, वरचीवाले, आडहत्यारी, पाईच्यांची गणतीच नाहीं. बराबरी फरासखाना, त्यासी शंभर हत्ती, तसेंच भांडते हत्ती चारशें, असे पांच सहाशें हत्ती, तसेंच अगणित उंट. यांखेरीज बाजारबुणगे, दारूगोळा, बाणांच्या भांडल्या गाड्या, आराबा असें अमर्याद सैन्य दिलें. स्वारी म्हणजे कलियुगींचा रावणच. जसी रावणाची संपत्तीची गणना न करवें तैसाच बराबरी खजिना

१. सभासदाची बखर, पृ. २९–३०.

बेमोहीन हत्ती, उंटें, खेंचरें, गाडियावर भरून नख्त व सोनें, रुपें मोहरा होन रुपये असें बत्तीस कोटी द्रव्य घेऊन दिल्लीहून निघाला. नबाब शास्ताखान म्हणजे पादशहाची प्रतिमाच दुसरी." हा दक्षिणेचा सुभेदार साठी उलटून गेलेला असा मोठा रुबाबदार व कसलेला सेनानायक होता. [1]"शिवाजी म्हणजे काय? त्यासि जातांच कैद करतों. गडकोट मुलूख घेऊन फत्ते करितों." असा मिशीला पीळ देऊन ठेक्यांत निघालेला. धुरळा उडवीत, मुलुखा-मागून मुलूख काबीज करीत, गांवाची धूळधाण उडवीत हा प्रति औरंगजेब दिनांक ११ फेब्रुवारी १६६० ला अहमदनगरला येऊन भिडला. तेथून आस्तेकदम तो पुढें पुढें सरकत होता.

महाराज याबेळीं मिरजेच्या किल्ल्याला वेढा देऊन बसले होते. [2]"अहमदनगरपर्यंत शाहिस्तेखान गगनाला गवसणी घालणाऱ्या प्रचंड सिद्धतेनिशीं येऊन धडकलेला व सिद्दी जौहर जवळ आलेला अशा कात्रींत महाराज सांपडले होते." ....अंगावर आलेल्या सिद्दी जौहरचें संकट प्रथम टाळावें व नंतर शाहिस्तेखानाच्या संकटाचा विचार करावा असें ठरवूनच त्यांनीं पन्हाळा गांठला होता. पन्हाळ्याला तळ देण्याचें आणखी एक महत्त्वाचें कारण होतें. सिद्दीला आपल्या मागोमाग राज्याच्या सरहद्दीकडे खेंचून न्यावें व पन्हाळ्याच्या मुसळधार पावसांत त्याच्या सैन्याची खराबी करून त्या कंटाळलेल्या मनःस्थितींत त्याला विजापूरचा रस्ता धरणें भाग पाडावें ही महाराजांची मसलत होती. शिवाय रायगड, पुणें वगैरे मध्यवर्ति भागाला या रणधुमाळीची झळ लागूं नये ही पण कल्पना होतीच; परंतु दोन्हीहि उद्देश साधले नाहींतच. कारण स्वराज्याचा गाभा सिद्दीच्या वरवंट्याखालीं सांपडला. बरें, पन्हाळ्याचा वेढा

१. सभासदाची बखर, पृ. २९. २. छत्रपति शिवाजी, भाग २, पृ. ३२२.



**वीररत्न बाजी प्रभु देशपांडे**



वेढ्याचे वेळचें पन्हाळा येथील
शिवछत्रपतींचें वसतिस्थान




पन्हाळ्यावरून सज्जा कोटींतून (महाराजांच्या राहत्या राजवाड्यांतून) महाराज रात्रीं ज्या राजदिंडींतून गड उतरून वेढापार होऊन पावनखिंडीच्या रोखानें गेले ती पन्हाळ्यावरील राजदिंडी.



सुमारें अर्धा मैल लांबीची पावनखिंड.



‘ विशाळगड ’ असें
‘ खेळणा ’ किल्ल्याचें
महाराजांनीं ठेवलेलें नांव
सार्थ करून दाखविणारी
विशाल दगडी
वर जाणारी वाट.




घोड खिंडीच्या
म्हणजेच पावन
खिंडीच्या वरच्या
अंगास चढलेलें हें
घोड मैदान.



विशाळगडावरील 'मुंढा' किंवा
'टेहळणी' दरवाजा.



विशाळगडावरील शिवछत्रपतींच्या राजवाड्याचे
व आंत शिरावयाच्या द्वाराचे
पडिक अवशेष.



पन्हाळ्याच्या वेढ्यांतून निसटून पावनखिंडीतून पार होऊन महाराज विशाळगडाच्या पायथ्यापासून किल्ल्याला वळसा घालून डावीकडून वर चढून गेले ती चिंचोळी वाट.



पन्हाळ्यापासून पायवाटेनें २२ मैलांवर असलेल्या ज्या गजापूर खिंडीत वीररत्न बाजी प्रभु प्राणपणानें झुंजले ती पावन झालेली ' पावनखिंड '.

पावसाळ्यांत ढिला पडेल म्हणावें तर सिद्दी जौहरनें गवताचीं छपरें बांधून आपल्या सैनिकांच्या निवाऱ्याची सोय केल्यामुळें वेढा उठण्याची आशाहि दुरावली. दुःखांत सुख इतकेंच कीं, या दोन प्रचंड शक्ति–सलाबतखान आणि शाहिस्तेखान पन्हाळ्याच्या पायथ्याशीं एकत्रित झाल्या नाहींत. तसें झालें असतें तर मात्र महाराजांचीं स्वराज्याचीं सारीं स्वप्नें कोठच्या कोठें हवेंतच विरून गेलीं असतीं. मग मात्र महाराजांना सहीसलामत पन्हाळ्यावरून निसटणें अशक्य कोटींतलें झालें असतें. तसें व्हावयाचें नव्हतें म्हणूनच औरंगजेबाला आपली मोहीम विजापूरकरांच्या मोहिमेपासून अलग, अगदीं स्वतंत्रपणें चालविण्याची दुर्बुद्धि आठवली ! याचाच परिणाम असा झाला कीं, महाराजांना सिद्दी जौहर व शाहिस्तेखान यांना अलग गांठून दोघांनाहि निकालांत काढतां आलें.

एवंच, स्वराज्याला एकाच वेळीं ग्रासूं पाहणारें हें दुसरें मोठें ग्रहण होतें. [1]"खानाच्या अवाढव्य सैन्याची हालचाल मंद गतीनें होत असली तरी बुभुक्षित मगरीप्रमाणें तो स्वराज्याचा एक एक घांस पचवीत चालला होता. कऱ्हे पठारांत घुसून त्यानें सुप्याची गढी घेतली. दि. ५ एप्रिल १६६० ला त्यानें बारामती व नंतर इंदापूर घेतलें. १६ एप्रिलला नीरा नदीच्या तीरावरील होळ नांवाचें गांव घेऊन त्यामागोमाग त्यानें शिरवळचा भुईकोट गड सुभान मंगळ जिंकला. तेथून राजगड अवघ्या दहा कोसांवर होता. त्याच्या आसपासचीं गांवें व प्रदेश खानानें पूर्ण उध्वस्त करून टाकले. महाराज पन्हाळगडावर जौहरच्या वेढ्यांत अडकून पडलेले, स्वराज्याचा सेनापति नेताजी पालकर दूर प्रदेशांत कामगिरीवर

---

१. छत्रपति शिवाजी, भाग २, पृ. ३२३.

गेलेला व जवळ कोणी नांव घेण्यासारखा सेनानी नाहीं; अशा स्थितींत राजगडासारख्या स्वराज्याच्या राजधानीवरच शाहिस्ते-खानाच्या संकटाची दाट छाया पडलेली होती—" अशा प्रकारें आगेकूच करीत खान जो दिनांक ९ मे १६६० ला पुण्यावर घसरला तो खुद्द महाराजांच्या लाल महालांतच ४० दिवस तळ ठोकून बसला. महाराजांचे इतर अनेक शत्रु या दोन खग्रास ग्रहणांचे परिणाम अजमावीत महाराजांच्या समूळ नाशाची कुंडली वर्तविण्यांत दंग झाले होते.

* * *

## ८. पेंचप्रसंग

साडेतीन महिने होत आले तरी वेढा उठण्याचा रंग दिसेना. महाराजांना प्रश्न पडला तो वेढ्यामुळें सैन्याची उपासमारी होईल हा नव्हता. आणखी कांहीं महिने सहजासहजीं गड लढवितां येईल इतकी अन्नपाण्याची तरतूद आगाऊच करून ठेवण्यांत आलेली होती. प्रश्न होता तो या शाहिस्तेखानाला आवर घालायचा कसा? ह्याला शासन करावयाचें कसें? पुण्यांत चाळीस दिवस हातपाय पसरून बसलेलें हें प्रचंड धूड म्हणजे उशाशेजारचें एक कायमचें दुखणें होऊं पाहत होतें. आपण तर इकडे वेढ्यांत अडकून पडलों. मातोश्री आईसाहेब तिकडे दूर राजगडास—या नागाच्या फूत्काराच्या अगदीं आटोक्यांत. स्वराज्यांतल्या सरदारांशीं व सेनानींशीं आपलें दळण-वळण पार तुटलेलें. आगोठीला वेढा उठेल असें वाटलें होतें, पण छे! हा कसलेला सेनानी जौहर पावसा-पाण्याचा बरोबर बंदोबस्त करून

वेढा आवळीतच चालला. बिलकूल कसूर नाहीं. रात्रंदिवस चौफेर खडा पहारा—बरं, बाहेरून कुमक येईल म्हणावं तर नेताजीचा कोठें ठावठिकाणाहि दिसेना.

तिकडे नेताजी वेगळाच डाव खेळत होता. खुद्द विजापूरलाच शह दिला कीं आपोआपच सिद्दीला पन्हाळ्याचा वेढा उठवून हा मालकाच्या गळ्याभोंवतींचा तांत ढिला करण्यासाठीं विजापूरचा रस्ता धरावा लागेल ही या प्रसिद्ध सेनानीची योजना होती. नाक दाबून तोंड उघडावयास लावण्याचा हा डाव होता. या दिशेनें नेताजीचे नेटाचे प्रयत्न चालूच होते. गोकाक, धारवाड, कुरुंदवाड, हुगेरी ते गदग असे विजापुरी मुलुख सपाट्यानें काबीज करीत तो विजापूरनजीकच्या शहापुरावर घसरला. हें सधन उपनगर त्यानें यथास्थित लुटलें. अंगावर चाल करून येणाऱ्या मुल्ला महंमदासारख्या विरुद्ध बाजूच्या सेनानायकांचा त्यानें पाडाव करून त्यांचे २००० घोडेस्वारहि कैद केले. अशीच पुढें विजापुरावर धडक मारण्याचा त्याचा विचार होता. परंतु सैन्य अपुरें पडलें, व नाइलाजानें खवासखानापुढें माघार घ्यावी लागली. अशा प्रकारें त्यानें योजलेला डाव साधला नाहीं. तेव्हां सिद्दीलालासह राजगडावर जाऊन त्यानें जिजाबाईसाहेबांच्या सांगण्यावरून सिद्दी जौहरच्या पिछाडीवर हल्ला केला. महाराज गडावरून हा प्रकार पाहत होते. त्यांच्या आशा पालवल्या. त्यांना वाटलें कीं, नेताजी सिद्दीच्या सैन्याची फळी फोडून गडाच्या पायथ्यापर्यंत जरी आला तरी आपणांस नेताजीशीं हातमिळवणी करावयास मिळून गडावरून निसटण्याची संधि मिळेल. परंतु सिद्दीच्या अफाट सैन्यापुढें त्याची कांहीं मात्रा चालेना. त्याचा हाहि प्रयत्न निष्फळ ठरला आणि महाराजांचा सुटकेचा मार्गहि त्याबरोबरच कुंठित झाला.

परिस्थिति जास्तच भीषण होत चालली. परंतु महाराज निराशाजनक परिस्थितींतहि स्वस्थ बसणारे नव्हते. उलट जितकी परिस्थिति बिकट तितकें त्यांचें मनोधैर्य अधिक कसाला लागे. त्यांनीं पन्हाळ्यावरील सज्जाकोठींत आपल्या निवासस्थानीं कारभारी मंडळी बोलावून त्यांचा सल्ला घेतला. या मंडळींत जी अत्यंत मोलाची, जिवाभावाची व निष्ठावंत मंडळी होती त्यांत किल्लेदार त्र्यंबक भास्कर, हेजीब गंगाधरपंत, आणि पांचहजारी सरदार बाजी प्रभू देशपांडे होते. बाजी प्रभु पन्हाळा प्रांतींच्या मोहिमांत महाराजांसन्निध राहिले. या बिकट प्रसंगींहि ते पन्हाळ्यावर होते. [१]"बाजीच्या देहाची इमारत भक्कम होती. सतत वीस बावीस तास कष्ट करण्याची त्यांची ताकद होती. त्यांचें वय या वेळीं सुमारें पंचेचाळीस ते पन्नास असावें. ते रंगरूपानें कसे होते कुणास ठाऊक! पण त्यांच्या शेल्याच्या पट्टीखालीं ती वाडसी छाती दडलेली असे. छातीच्या आंत निष्ठा दडलेली असे. म्यानांत समशेर दडलेली असे. समशेरींत पराक्रम दडलेला असे. अन् शंकराच्या मंदिरांत हात जोडतांना जो भाव हृदयांत असावयाचा तोच भाव महाराजांस केल्या जाणाऱ्या त्यांच्या मुजऱ्यांत दडलेला असे. असे मोठ्या गजबुद्धीचे बाजी पन्हाळ्यावर महाराजांच्या पाठीशीं होते."

या सल्लामसलतींतून अखेर निष्पन्न काय झालें? तर एक महान् धाडस! नुसतें धाडसच नव्हे तर त्या धाडसामागें एक ठराविक निश्चित स्वरूपाची परिपक्व योजना होती. महाराजांच्या सर्वच योजना परिस्थितीचा साधक-बाधक विचार करून दूरदर्शीपणानें नीट आंखलेल्या असत आणि म्हणूनच ते हरएक आणीबाणीच्या प्रसंगांतून सहीसलामत पार पडून यशवंत होत असत.

---

१. राजा छत्रपति, पृ. १०१.

लगेच महाराजांनीं सिदी जौहरकडे गंगाधरपंतांना पाठवून कळविलें कीं, "उदयीक किल्ला स्वाधीन करतों व स्वतःहि स्वाधीन होतों." शत्रूला हें खरें वाटेना. तेव्हां "जीविताला अपाय होणार नसेल तर मी स्वतः गडाखालीं येऊन खात्री करीन" असें म्हणून महाराज जातीनें सलाबतखानास भेटून आश्वासन देऊन गडावर सायंकाळीं परतले. याचा व्हावयाचा तोच परिणाम झाला. उदयीक प्रातःकालीं महाराज आणि त्यांचें मराठी राज्य यांचा घांस आपल्या ताटांत पडणार या गोड गुंगीची सर्वांवर मोहिनी पडली. सादतखान हुरळला. फाझलखान हुरळला—सारीं खानं हुरळून गेलीं. वेढा शिथिल पडला. डोळ्यांत तेल घालून साडेतीन महिने खडा पहारा करणारे पहारेकरी त्या रात्रीं निघोरी झोंपी गेले. जो शिवाजी अफजुलखानाच्या तावडींतून निसटला तो आतां माझ्या पुरा मगरमिठींत सांपडला या गोड नशेंत सिदी निवांत झोंपीं गेला. फक्त कांहीं प्रहरच मधीं कीं... पण ह्या प्रहरांत कोणती भवितव्यता दडली होती देव जाणें!

## ९. ती रात्र आणि तो दिवस

आषाढ पौर्णिमा शके १५८२—दिनांक १२ जुलै १६६०. गुरुवारीं रात्रीं दहाचा सुमार. महाराज सज्जा कोठींतून—आपल्या उंच प्रशस्त राजवाड्यांतून—सदरेस आले. गंगाधरपंतांच्या खांद्यावर हात ठेवीत ते म्हणाले, "गंगाधरपंत तुमच्या कामागिरीचं मोल आम्हीं जाणतों. यापुढं पन्हाळगडाचं नीट संरक्षण करा. आम्ही निघालों." इतकें बोलून महाराजांनीं गडावरील मंडळींचा निरोप

घेतला आणि ते पालखींत बसले. जास्त बोलायला वेळ नव्हता. प्रत्येक क्षण मोलाचा होता. भोयांनीं पालखी उचलली. परत एकदां त्या गडाकडे, त्या आपल्या माणसांच्याकडे आणि गडावरील हरएक वस्तुमात्राकडे महाराजांची धांवती नजर फिरली. सजल नेत्रांनीं त्यांनीं भवानी मातेचें आणि स्वत:च्या पूज्य मातेचें स्मरण केलें आणि—

राजदिंडीच्या मार्गें हेरांकडून आधींच शोधून काढलेल्या चोरवाटेनें सावल्या सावकाश सरकूं लागल्या. सरकणारे त्या वाटेला सरावलेले होते. वाट अत्यंत विकट होती. पुढें हेर, मग मावळे, मध्यें पालखींत महाराज, बाजूस बाजी प्रभूसारखा खंदा संरक्षक–सहाशें सशस्त्र सैनिक, बरोबर १०-१५ घोडे आणि एक रिकामी पालखी. कोण धाडसी बेत हा ! अंगावर शहारे आणणारा ! खालीं चौफेर पसरलेल्या हजारों सशस्त्र हशमांच्या वेढ्यांतून "रोखलेल्या तोफाबंदुकांच्या कैचींतून निसटण्याचा ! प्रत्यक्ष काळाच्या कराल दाढांतून सुटण्याची करामत ! महाराजच हें धाडस करों जाणें ! आणि त्यांच्या धैर्यानें उत्स्फूर्त झालेले ते अनुयायी पण !"

पौर्णिमेची रात्र असूनहि चांदण्याचा ठावाठिकाणाहि नव्हता. आकाश चांगलेंच ढगाळलेलें होतें. तुफान वारा घोंगावत होता–तो या चोर पावलांची चाहूल गुंजवीत होता. मुसळधार पाऊस कोसळत होता.–तो पहारेकऱ्यांना तंबूच्या, राहुट्यांच्या आश्रयास कनातीआड पाठवीत होता. निसर्ग या साहसाला साहाय्य करीत होता. इतकेंच नव्हे तर मधून मधून चमचमणारी वीज वाटाड्यांना मार्गदर्शन करीत होती. पहा शिवभारतकार म्हणतात—

व्रजते भूभृतेऽमुष्मै चरदुष्टचरे पथि
स्थली निम्नोन्नतां सद्य सौदामिन्योऽन्वदर्शयन् ॥ ५८ ॥

पन्हाळा ते विशाळगड २८ ते ३० मैलांचें अंतर पायीं काट्यांकुट्यांतून, चिखलाच्या राबडींतून, जंगलझुडपांतून, खांचखळग्यांतून ओहळनाल्यांतून, पावसापाण्यांतून आणि भयानक संकटांतून काटत जावयाचें होतें. मागेंपुढें पाहावयासहि वेळ नव्हता. इतकेंच काय पण विशाळगडावर जाणें तरी कुठें साधेसुधें काम होतें ? सिद्दी जौहरनें तेथेंहि तळाला पक्का बंदोबस्त करून ठेवला होता. विशाळगड जरी महाराजांच्या मंडळींच्या हातांत होता तरी पायथ्याला कोंकणांतील पालवणचे राजे जसवंतराव दळवी आणि शृंगारपूरचे राजे सूर्यराव सुर्वे हे दोन विजापूरकरांचे सरदार, दोन मातबर राहूकेतु विशाळगडाला वेढा देऊन बसलेलेच होते. म्हणजे अशा या वेढ्यांतून लढा देत किंवा जमेल तर वेढा चुकवीत विशाळगड चढायचा ! पन्हाळ्याच्या वेढ्याच्या दिव्यांतून पार पडावयाचं व कमींत कमी २८ ते ३० मैल अंतर–तेंहि ह्या प्रकारचं–हें पायीं काटायचं आणि दुसऱ्या विशाळगडच्या वेढ्यांतून परत निसटायचं ! साहसावर साहसी कार्यें मागेंपुढें वाढून ठेवलेलीं !


येथें एका महत्त्वाच्या मुद्याकडे वाचकांचें लक्ष वेधून घेणें जरूर आहे. तो मुद्दा असा :—कवींद्र परमानंद या शिवकालिन लेखकानें शिवभारतांत म्हटलें आहे कीं, ‘ शिवरायानें पन्हाळा ते विशाळगड हें ४० मैल अंतर ७ प्रहरांत आक्रमिलें. ’ परंतु २१ तासांत इतकें अंतर पावसांत, राबडींत, काट्याकुट्यांतून व डोंगराळ अशा उंचसखल भागांतून सतत चालून जाणें कसें शक्य आहे ? असा प्रश्न पडतो. तेव्हां हें अंतर कमी असलें पाहिजे असें वाटूं लागतें. या दृष्टीनें पन्हाळा ते विशाळगड या भागाची पाहणी करतांना हें अंतर ४० मैल नसून २८ मैलांच्या आसपास आहे हें सिद्ध करून दाखवितां येतें. पन्हाळ्याखालील म्हसाईचे पठारावरून साळशी आंबरडें या गांवा-

वरून पावनाखिंडीच्या तोंडाजवळ निघणारी पायवाट आजहि अस्तित्वांत आहे व ती सध्या चालू आहे. ही पायवाट मी या पुस्तकांत दिलेल्या नकाशांत दाखविली आहे. हें अंतर २२ मैल आहे. त्यांत पावनखिंडीपासून विशाळगडापर्यंतचें ६ ते ७ मैल अंतर मिळविलें तर पन्हाळा ते विशाळगड हें एकूण अंतर २८ ते २९ मैल भरतें.

शत्रु पाठीवर घोडदौड करीत माग काढीत येत आहे हें माहीत असतांना पन्हाळा ते विशाळगड यांमधील सरळ रेषेंतील कमींत कमी असलेल्या अगदीं जवळच्या वाटेनेंच महाराज गेले असले पाहिजेत हें कोणालाहि पटण्यासारखें आहे. नकाशांत दाखविलेली पायवाट ही सरळ रेषेंतील अगदीं नजीकची वाट आहे. तेव्हां महाराज या वाटेनेंच नसले तरी या वाटेला धरूनच थोड्याशा फरकानें—कारण वाट डोंगराळ असल्यानें—गेले असले पाहिजेत हें उघड आहे. त्यांतून महाराजांना व मावळ्यांना डोंगर पठारांतील चोरवाटांचें सूक्ष्म ज्ञान होतें ही गोष्ट इतिहासवाचकांस पूर्णपणें अवगत असल्यामुळें २९ ते ३० मैलांपेक्षांहि चारदोन मैल अंतर कमीच भरण्याचा संभव आहे. कवींद्र परमानंदांच्या इतिहासाला सत्यकथन म्हणून रास्त महत्त्व दिलें जात असलें तरी त्यांच्याहि लिखाणांत क्वचित् प्रसंगीं सदोषता असण्याचा संभव आहे. त्यापैकींच ही एक बाब होय.

पन्हाळ्याचा वेढा किती कडक होता याचें वर्णन कवि परमानंदांच्याच शब्दांत द्यावयाचं तर—

अद्याता नैव निर्याति न चायाति पिपीलिका ।
वथोपविविशुस्तत्र ततो जौहरसैनिकाः ॥ ११ ॥
अंधीकृत्येव तास्तत्र निविष्यन् प्रतियोधिनः ।
शिवः स्वीयेन शौर्येण परिधिं तमलंघयत् ॥ १२ ॥




या नकाशांत दाखविलेल्या पायवाटेनें किंवा त्यालगतच्या सरळ रेषेंतील मार्गानेंच पन्हाळा ते विशाळगड हें २८ मैलांचें अंतर कापून महाराज वेढापार झाले.

वेढ्यांतून एखादी मुंगी जरी निसटण्याचा प्रयत्न करील तरी ती गोष्ट लक्षांत आल्याशिवाय राहणार नाहीं. परंतु अशा प्रकारें कडक वेढा घालून बसलेल्या वीरांची नजरबंदी करूनच कीं काय महाराज स्वपराक्रमानें वेढापार झाले.

निसर्ग महाराजांना मदत करीत होता तसाच तो चुकून कोठें शत्रूचे हेर जागरूक असतील त्यांनाहि मदत करीत होता. आणि 'शिवाजी तो भाग गया!' असा गिल्ला बराच वेळानंतर उठला. तोंपर्यंत हें पथक पन्हाळ्याचा वेढापार होऊन पुष्कळच दूर गेलें होतें. घोड्यावरून व पायीं शत्रु पाठीवर सुटला. चंद्रज्योतींच्या प्रकाशांत, फौज रातोरात चंद्रज्योती लावून मार्ग काढीत पाठीवर कुल लागली. शिद्दी जौहरनें आपला जांवई सिद्दी मसूद याला तीन हजार सैन्य देऊन या कामगिरीवर रवाना केलें. पण त्यांनाहि नैसर्गिक अडथळे आड आलेच — वारा पाऊस, चिखल, चमत्कारिक वाट इत्यादि. गुडघाभर चिखलांत मसूदचे घोडे अडकून पडत. त्यांतूनहि त्यांना वाट काढावी लागे.

"आजानु तुरगास्तस्य ममज्जुः पथि पंकजे।
निपेतुः पतयश्चापि सांद्रशैवाल संकुले"

(चिखलाळ मार्गांत यांचे घोडे गुडघ्यापर्यंत रुतले व पदातीसुद्धां दाट शेवाळामध्यें पडले.)

बऱ्याच वेळानें एक पालखी व कांहीं लोक शत्रूच्या हातीं लागले. त्यांना घेऊन मोठ्या आनंदांत जौहरसमोर नेण्यांत आलें. शिवाजी हातीं आल्याचा त्यालाहि मोठा आनंद वाटला — पण तो क्षणभंगूरच ठरला! कारण हा तर 'तोतया शिवाजी' होता. शिवा नाहीं! खरा शिवाजी विशाळगडाकडे दौडतच होता. म्हणजे

वेळ काढूपणाची ही त्याची शक्कल होती तर! हरहर! काय करावें या शिवाजीला? हातावर तुरी देण्यांत मोठा वस्ताद खरा! मग परत पाठलाग चालू झाला.

या वेळपावेतों सकाळ उजाडली. दिनांक १३ जुलै १६६० ची ती सुमंगल वेळ. अद्याप इडापिडा पूर्ण टळली नव्हतीच. पहाटे-पूर्वीचा काळोख सांदीकोपऱ्यांत दबा धरून होता. पुढें प्रहर दिवस वर येतां विशाळगडचा किल्ला नजिक दिसूं लागला. फक्त सहासात मैल अंतर पायथ्यापर्यंतच राहील. अफाट सैन्यानिशीं शत्रु दांतओठ खात मागून दौडत येत होता. इथेंच पांढऱ्या पाण्याजवळ गजा-पूरची खिंड लागली. दोन बाजूंना उंच डोंगर व मधून चारपांच फर्लांगपर्यंत गेलेली अगदीं अरुंद अशी खोलगट वाट. आतां फौजे-सह शत्रु अंगावर येऊन भिडला तर साराच कारभार आटोपणार हें जाणून व महाराजांस विशाळगडास पोहोंचण्यास अवधि मिळावा म्हणून वीररत्न बाजीप्रभूनें महाराजांस त्वरा करून विशाळगडास ३०० लोकांनिशीं जाण्याबद्दल विनंति करून आपण स्वतः ३०० मावळ्यांसह ती खिंड लढविण्यासाठीं ते सज्ज झाले.

[1]" ते समयीं बाजी प्रभु देश कुलकर्णी हीरडेस मावलकर धार-करी राजे यांस म्हणो लागले कीं, तुम्ही निम्मे लोक घेऊन गडावर जातांच तोफाचे आवाज करणें. तों पावेतों या खिंडीमध्यें आपण निम्मे मावळे घेऊन दोन प्रहरपावेतों पाठीवर फौज येऊं देत नाहीं. साहेबी निघून जाणें. आपण साहेब कामावर मरतों........ असें म्हणोन......... राजे यांस वाटे लाविलें."

या प्रसंगावर बाजी प्रभूंच्या तोंडीं घालण्याजोग्या कांहीं ओळी मला सुचल्या.

---

१. ९२ कलमी बखर, कलम ३९.

"जा राया तूं जा विशाळीं उचल पाऊल जल्दी
खिंड रोखतों, प्राण वेंचितों, देइ खुणेची वर्दी
प्राण तुझे हे प्रिय आम्हांला पंचप्राणाहुन
आंबा मोते ठेवी अमुच्या शिवबा जोमाळुन.
शास्ताखाना शास्त कराया जा जा जा जल्दी
खिंड रोखतों, प्राण वेचितों, देइ खुणेची वर्दी
पुढती जातां दृष्टी मागें शिवरायाची वळे
नयनांतूनी नीर पाझरे 'हो' म्हणुनी डोले."

[1]"महाराजांनीं सद्गदित अंतःकरणानें बाजी प्रभूचा व त्या तीनशें रणधीरांचा निरोप घेतला व ते विशाळगडाकडे धांवूं लागले. पायथ्याशीं असलेल्या जसवंतराव व सूर्यरावांच्या सैन्याशीं स्वतः महाराजांना आपल्या तीनशें मावळ्यांनिशीं प्रखर युद्धांत गुंतावें लागलें व तिकडे गजापूरच्या खिंडीवर आदळणाऱ्या मसूदखानाच्या प्रचंड सेनेशीं तीनशें मावळ्यांनिशीं बाजी प्रभु अर्जुनासारखें भीषण समर करीत होते. विशाळगडावरील शत्रूचा वेढा फोडावयास व गडावर पाऊल ठेवावयास महाराजांना दोन प्रहर लागले. शिवभारतकार म्हणतात—

"पल्लीवनाचा (पालीचा) राजवीर जसवंतराव, शृंगारपूरचा राजा प्रतापी सूर्याजीराव आणि दुसरेहि सामंत त्या गडास वेढण्याच्या कामीं त्या दुरात्म्या दुष्ट जौहरानें पूर्वीच नेमले होते; ते वारंवार लढत असतांहि पदोपदीं पराभूत झाल्यामुळें गडावर चढणाऱ्या शिवाजीमहाराजांना अडवूं शकले नाहींत."

ततः सप्तभिर्यामैः पंचभिर्योजनैर्मितम्
अतीत्य किल पंथानं विशालं शैलमासदात् ॥ १३ ॥

१. छत्रपति शिवाजी, भाग २, ३३८.

इकडे बाजीप्रभूंना झुंज द्यावयाची होती ती दुहेरी होती. शत्रूच्या अफाट सेनेशीं आणि धांवत्या वेळेशीं! जर दमलेल्या मूठभर तीनशें लोकांनीं ३००० ताज्या दमाच्या शत्रूशीं मुकाबला कांहीं तास द्यावयाचा तर या डोंगरामधल्या चिंचोळ्या वाटेचाच फायदा घेऊन हें कार्य पार पाडतां येईल हें बाजी प्रभूंनीं अचूक हेरलें. या ठिकाणाला लष्करी महत्त्व होतें. त्यांत बाजी प्रभु म्हणजे गनिमी–युद्धतंत्र-विशारद असे धीराचे, कसलेले सेनानायक. या अगदीं बारिकशा जेमतेम एखाद-दुसरा मनुष्य एका वेळीं आंत शिरूं शकेल अशा या खिंडीच्या नैसर्गिक संरक्षणाचा फायदा घेऊन बाजी प्रभूंनीं समय-सूचकतेनें [1] "ठिकठिकाणीं मोर्चेबंदी केली. शत्रूस आपली फौज कोठें आहे हें समजूं नये, एतदर्थ या वीरानें दाट झाडीमध्यें आपले लोक उभे केले. लष्कर फारच थोडें असून शत्रूस तें असंख्य वाटावें, या करितां या सरदारानें अनेक युक्त्या योजिल्या होत्या. धारबंद दगडांचे व गारगोट्यांचे थैले भरून ते निबिड झाडींतील वृक्षांवर चढविले व तेथून गोफणींचा मारा शत्रूवर चालविला. याप्रमाणें पक्का बंदोबस्त करून बाजी प्रभु हा आपल्या गांवच्या पन्नास मावळे लोकांनिशीं खिंडीच्या नाक्यावर उभा राहिला."

ही खिंड प्रत्यक्ष पाहणाराला वरील वर्णनांत जरासुद्धां अति-शयोक्ति वाटत नाहीं. हें ठिकाण गनिमी पद्धतीच्या युद्धकलेला अत्यंत अनुकूल आहे असें माझें मत आहे. म्हणजे बाजीप्रभूंनीं नुसती शौर्यशाली झुंज दिली, एवढेंच नव्हे तर ते डावपेंचानें पण लढले.

थोड्याच वेळांत युद्धाला रंग भरला. मुसलमान त्वेशानें खिंडींत घुसण्याचा प्रयत्न (Stratagic Fight) करीत होते; परंतु त्यांची मात्रा चालत नव्हती. बाजी प्रभूंची समशेर तळपूं लागली. त्यांच्या दांड-

---

* प्रभु रत्न माला पृष्ठें ७४-७५.

पट्टयाचा हात सुरू झाला. या पंचेचाळीस वर्षे वयाच्या बाजींत तरुणाचें रक्त सळसळत होतें. खिंडींतून आंत शिरूं पाहणारा प्रत्येक शत्रु जागच्या जागीं गारद होऊन पडला. बाजी, त्यांचे बंधु फुलाजी आणि त्यांचे मावळे हिमतीनें लढले. काळालासुद्धां कांहीं वेळ स्तब्ध राहून या पराक्रमी सेनानायकाचं युद्धकौशल्य पाहत राहावं असं वाटलं तर नवल नाहीं. त्या कालाची गति सावकाश चालली होती, पण बाजींचा पट्टा अत्यंत जलदीनें, सफाईनें चालला होता. बाजी प्रभूंनीं अनेक हल्ले शिताफीनें परतविले. ते आपल्या लोकांना सारखा उत्साह देत होते. खिंडीच्या दोन्ही तोंडांकडे सैन्याचा पक्का बंदोबस्त केलेला होता. मधून मधून शत्रूवर वरतून दगड, दरडी कोसळून पाडण्यांत येत होत्याच. मूठभर मावळे, पण त्यांनीं युद्धाची शर्थ केली. मोठी कजाखी जहाली. बाजींचे देहावर वीरत्वाच्या अनेक खुणा उमटल्या. देहाची चाळण झाली. इतक्यांत शत्रूला ताज्या पायदळी तुकडीची कुमक मिळाली. बाजींच्यावर कोणीतरी प्राणांतिक घाला घातला. " थांबा, पळूं नका. शत्रूला मराठ्याचं पाणी दाखवा. लढत राहा. " इतकं होतं तों विशाळगडावरील सूचक तोफांचे आवाज त्यांचे कानीं पडले. " माझं काम संपलं. स्वामीसेवा पार पडली. " या उदात्त भावनेंत त्यांनीं प्राण सोडला.

वर्मीं लागुनि घाव शत्रुचा घायाळ जरि झाला ॥
मृत्यूसमयीं तोफ ऐकुनीं आनंदें धाला ॥

गजापूर खिंडीनें ऐनवेळीं हात दिला असला तरी या वीराचं कुशल सेनानायकत्व अन् कमालीचं शौर्य व जिवावर उदार होऊन वीरश्रीनें लढण्याचा मराठी रक्ताचा बाणा हाच गजश्रेष्ठाचं बळ पुरवीत होता. गजापूर खिंड पावन झाली.

पावनखिंडिंत इमान शिंपित रक्ताचा तो सडा।
स्वराज्यकामीं वीर मराठा असा खडा

कणाकणांतुनि भातीच्या त्या उज्वलता चमके।
बिंदुबिंदुंतुनि रक्त रक्तिमा वीर्याचा उजळे ॥

असं वाटल्याशिवाय राहात नाहीं.

[१]" महाराज प्रतीक्षा करीत होते जिवंत बाजी प्रभूची ! पण त्यांच्या दर्शनार्थ मावळ्यांनीं शस्त्राघातांनीं अक्षरशः चाळणी झालेलें बाजी-प्रभूचें प्रेतच आणलें. धन्य बाजी ! शिवछत्रपतींच्या प्रेमाश्रूंची माळ शेवटीं तुझ्या कंठांत पडली. स्वराज्याचें सिंहासन असेंच रक्तगंगेंतून निर्माण व्हावें हा ईश्वरी संकेत आहे."

[२]" संध्याकाळनंतर मसूदखान आपल्या दमलेल्या सैन्यासह गजापूरची खिंड तुडवून पुढें निघाला. वाटेंत त्याला सूर्यराव व जसवंराव पराभूत अवस्थेंत भेटले. त्यांच्या तोंडून महाराज गडावर पोहोंचल्याची वार्ता कळतांच निराशेचा काळा पडदा त्याच्या डोळ्यांवर आला. त्यानें दांत ओठ चावून गडाला वेढा दिला. पण गडावरील ताज्या दमाच्या मावळ्यांनीं त्याला व त्याच्या सैन्याला देमाय धरणीठाय करून सोडलें. पराभवानें काळें ठिक्कर पडलेलें तोंड घेऊन मसूदखान परत पन्हाळ्यावर आला. सेनापति जौहरवर या पद्धतीची मात यापूर्वीं कोणीहि केली नसेल. मसूदखान जिवंत आला हेंच आपलें मोठें भाग्य असें त्याला वाटल्याविना राहिलें नाहीं."

शिवदिग्विजय बखरींत पान १८३ वर यासंबंधीं उल्लेख आहे तो असाः—

" बाजी प्रभु रणभूमीस येतां घाट मोकळा झाला. यवनाचे फौजेस सुगम पंथ होवून, विशाळगडाखालीं येऊन गजापुरीं मुक्काम

---

१ ' छत्रपति शिवाजी ' भाग २ पृष्ठ ३३९

[२] ' छ. शि. ' भा. २ पृष्ठ ३३९-३४० बाळशास्त्री हरदास.

केला.....तेही यवन महा कजाख मोठा सरंजाम त्यांणीही तोफा गर्नाळाचे मोर्चे बांधून, विशाळगडीं महाराज दस्त, येविशीं त्यांचाही प्रयत्न चालला होता. परंतु सुरंगाची वातमी कळोन मोर्चावरी लोक पाठवून मोर्चा उठाविला. यवनाचे लोक कंटाळोन हें कोकण, झाडी मनस्वी राहून परिणाम शुद्ध दिसत नाहीं. येथून कुच करून माघारे पन्हाळ्यास आले."

पंतप्रतिनिधींची बखर पान ११, १२ आधारें 'किल्ले विशाळगड' या श्रीयुत पं. बा. शिरवळकर यांनीं लिहिलेल्या पुस्तकांत अधिक सविस्तर माहिती याविषयीं पानें ११-१२ वर आहे ती डोळ्यांखाळून घालण्यासारखी वाटते:—

"यानंतर खानानें विशाळगडास वेढा घातला. परंतु गड सर झाला नाहीं. पाण्याचा तुटवडा पडला. डोंगर, रान व जंगल यांमुळें त्याच्या फौजेचा इलाज चालेना. अन्नाच्या टंचाईमुळें मुसलमानी सैन्य हैराण झालें. फाजलखानानें फितुरी करण्याचाहि यत्न केला. परंतु मराठे लोक मूळचेच इमानी. त्यांत प्रत्यक्ष महाराजांचें वास्तव्य गडावर असल्यानें तोहि इलाज चालेना. किल्ल्यानजीक सुरुंग खणून किल्ल्यावर जाण्याचा इलाज चालविला. परंतु पुढें काळे दगड लागल्यानें खणण्याचाहि उपयोग होईना. मुसलमानी सैन्यानें गजापुरानजीक छावणी केली होती आणि विहिरी खणल्या होत्या. त्या अद्याप आहेत. गोणीमुठानजीक घोणसळी म्हणून मोठा उंच डोंगर किल्ल्यासमोर आहे. त्या डोंगरावर फौज नेऊन तोफांचा मारा सुरू केला. परंतु किल्ल्यास गोळा लागूं झाला नाहीं. अशा रीतीनें सर्व बाजूनें पराभव झाल्यावर फाजलखान वेढा उठवून परत निघून गेला."

ही पंतप्रतिनिधींच्या बखरींतली हकीकत शिवदिग्विजय बखरीशीं बरीचशी जुळते. शिवाय वर म्हटल्याप्रमाणें विशाळगडाखालीं खणून किल्ल्याला सुरुंग लावणें कसें अशक्य ठरलें, हें हा किल्ला बारकाईनें प्रत्यक्ष पाहिल्यावर कोणासहि समजून येण्यासारखें आहे. फत्तर मोठमोठे, काळेभोर व अत्यंत कठीण आहेत व ते तटबंदी करतांना एकांत एक जाम बसविलेले आहेत.

* * *

## १०. वंशपरंपरागत मानमान्यता

महाराजांनीं बाजी प्रभूंच्या मुलास बोलावून आणलें व त्यास त्यांचा सरदारी दिली. यासंबंधीं मल्हार रामराव चिटणीस यांचे बखरींत पान ६५ वर खालील मजकूर आढळतो. :—

" बाजी देशपांडे स्वामिकार्यावरी खर्च झाले. शिपाईगिरीची शर्त करून रणीं पडले, त्यांचे लेक बाळाजी बाजी यांसी आणून नांवाजून त्यांची सरदारी त्यांस दिली. त्याचे भाऊ सात होते. त्यांस आणून पालख्या व तैनात करून दिल्या. मावळे लोकांची सबनिशी सांगितली. बक्षीस दिलें. "

या बखरींत ' बाळाजी बाजी ' असें म्हटलें आहे, पण हें नांव चुकीचें आहे. कारण, बाजी प्रभूंच्या वंशावळींत बाजीचा ज्येष्ठ चिरंजीव यांस ' बावाजी ' म्हटलें आहे. ' प्रभुरत्नमालेंत ' पान ८० वर यासंबंधीं उल्लेख आहे. त्यांत ' बावाजी बाजी ' असेंच म्हटलें आहे.

' वीररत्न बाजी प्रभु देशपांडे ' या श्रीयुत बा. स. कुलकर्णी यांनीं लिहिलेल्या पुस्तकांत बाजी प्रभूंचा वंशवृक्ष दिलेला असून



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.

कांहीं महत्त्वाचे ऐतिहासिक कागदपत्रांचे पुरावेहि दिले आहेत. या पुस्तकांत पान ५४ वर खालील मजकूर दिला आहे:—

" बावाजी बाजी यांस शिवाजीनें त्याच्या वडिलाची सरदारी, जमेनिशी वतनी करून दिली, त्या खेरीज कुलकिल्ल्याचें विशाळगड किल्ला खेरीज करून कारखानिशीचा धंदा वतनी करून दिला. हा फार शूर व पराक्रमी होता. सन १६७८ त विजापूरकराचा सरदार युसूफखान शिवाजीवर चालून आला, त्यावेळीं सावनूर येथें जी प्रसिद्ध लढाई झाली, त्या लढाईत हंबीरराव मोहित्यावरोबर बावजी प्रभु होता."

महाराजांनीं बाजी प्रभूंच्या मुलास सरदारी देऊन त्याच्या अन्नपाण्याची तरतूद तर केलीच, पण यापेक्षांहि बाजी प्रभु व त्यांचे बरोबरीचे मावळे यांनीं आत्मबलिदानानें जी अनन्य साधारण करामत करून दाखविली, त्याबद्दल त्यांचा त्यांचे पश्चात् विशेष प्रकारचा दरबारी गौरव चालू ठेवला. तो असा:—

[1]"....बांदलांच्या लोकांनीं पराक्रमाची शर्थ केली. महाराज गडावर पोंचल्याच्या इशारतीचा आवाज कानीं पडल्यानंतर बाजी प्रभूंनीं आपले प्राण सोडले. एकदां धीर सुटल्यानंतर बांदलांच्या राहिलेल्या मूठभर लोकांची कत्तल कशी झाली असेल हें सांगावयास नको. महाराजांना ही गोष्ट फार लागली. अफजलखान-प्रसंगांतील उत्कृष्ट कामगिरीसाठीं जेधे देशमुखांना दरबारांत तरवारेच्या पहिल्या पानाचा मान होता. तो आतां बांदल देशमुखांना द्यावा असें महाराजांनीं ठरविलें व त्यासाठीं जेध्यांची संमति मिळविली. आपल्या स्वराज्यांतील पहिल्या दर्जाच्या शूर वीराचा मान बाजी प्रभूंनीं आपल्या बलिदानानें मिळविला. स्वामिभक्त बाजी प्रभूंचें नांव इतिहासांत अजरामर झालें."

* * *

१. पृष्ठें ९१–९२ श्रीयुत दि. वि. काळेकृत, 'छत्रपति शिवाजीमहाराज'

## ११. बाजी प्रभु व लिऑनिडस्

कै. महादेव गोविंद रानडयांसकट बरेचसे जुनेनवे इतिहासलेखक वीररत्न बाजी प्रभूंची लिऑनिडस् या ग्रीक लढवय्याबरोबर तुलना करतांना आढळतात. परंतु ही तुलना तितकीशी समर्पक नाहीं असें खोल विचारांतीं माझें मत झालें आहे. वास्तविक बाजी प्रभूंनीं बजावलेली कामगिरी लिऑनिडस्च्या कामगिरीपेक्षां अधिक मोलाची ठरते. लिऑनिडस्च्या आधिपत्याखालीं १४०० स्पार्टन् लोकांनीं झार्जिसच्या अफाट सेनासागराबरोबर इ. सनापूर्वी ४८० वर्षांमागें थर्मापायलीच्या खिंडींत जो सामना दिला, त्याची गजापूरच्या खिंडीच्या या सामन्याशीं तुलना करून त्यांतलें साम्य दाखविलें जातें. कोणी तरी इंग्रज इतिहास-लेखकानें प्रथम अशी तुलना करून दाखविली असावी व त्याचीच सखोल विचार न करतां री ओढण्यांत आमचे नवेजुने इतिहासकार गर्क झाले असावेत! फार छोटया सैन्यानें फार मोठ्या सैन्याशीं प्राणपणानें झुंज देणें इतकीच ही मर्यादित तुलना धरली तर ठीक आहे, परंतु दोन्ही प्रसंगांतला महत्त्वाचा फरक दृष्टीआड करून चालणार नाहीं. लिऑनिडस्च्या आधिपत्याखालीं १४०० ग्रीक वीरांना जें उद्दिष्ट साध्य करतां आलें नाहीं, तें बाजी प्रभूंच्या आधिपत्याखालील ३०० मावळी पथकानें शत्रूच्या ३००० सेनेविरुद्ध सहासात तास सतत लढा देऊन साध्य करण्यांत भरघोस यश मिळविलें. आपल्या स्वामीच्या केंसालाहि धक्का लागू न देतां त्याला स्वराज्याच्या पुढील योजना पार पाडण्यासाठीं शिल्लक ठेवणें व हें ध्येय साध्य करण्याकरितां भीषण रणसंग्राम देऊन तो यशस्वी करणें हें अत्यंत महत्त्वाचें कार्य होतें आणि तें गजापूर ऊर्फ पावनखिंडीच्या संग्रामानें साधलें. तसें लिऑनिडस् व त्याच्या पथकाला साधलें नाहीं. बाजी प्रभूंच्या पथकाला फक्त खिंडीच्या

एकाच तोंडावर शत्रूशीं लढत द्यावी लागली व ती त्यांनीं लष्करी-दृष्ट्या गनिमी-युद्धकलेच्या पद्धतीनें मोठ्या शिताफीनें दिली. याच्या उलट लिऑनिडसला थर्मापायलीच्या दोन्ही तोंडांवर लढत द्यावी लागली. याला एका दृष्टीनें लढत म्हणणेंच चुकीचें ठरेल. कारण जेथें थर्मापायलीच्या आघाडी-पिछाडीच्या दोन्ही तोंडांची नाकेबंदी करून आंत सांपडलेला माणूसमात्र छाटून टाकण्यांत आला तेथें याला झुंज तरी कसली म्हणायची ! इतकेंच नव्हे तर एकदां थर्मा-पायली पार मोडून झोडून निकालांत काढल्यावर अथेन्सवर सरळ झर्किस चालून गेला व तेथें त्यानें विजयाचा झेंडा उभारला म्हणजे शत्रु नेस्तनाबूद झाला नाहीं, अडवून धरतां आला नाहीं, उलट तो जोरावर चढला, संपूर्णपणें विजयी झाला. याचाच अर्थ लष्करीदृष्ट्या व परिणामी, बाजी प्रभु संख्याबलानें फारच कमजोर असून, केवळ आपल्या क्षात्रतेजानें व युद्धकौशल्यानें यशस्वी ठरला, तसा लिऑनिडस् ठरला नाहीं. यावरून बाजी प्रभूंनीं बजावलेली कामगिरी अंतिम परिणामीं फारच मोलाची आहे, अधिक सरस आहे. म्हणूनच त्याला ऐतिहासिक महत्त्व आहे.

* * *

## १२. बाजी प्रभूंचें स्मारक

आणि असें असूनहि ज्या रणझुंजारानें जगाच्या इतिहासांत अतुलनीय ठरेल असा अप्रतिम सामना दिला त्याचें स्मारक झालेलें नसावें ही सखेदाश्चर्याची गोष्ट आहे यांत शंका कसली ? लिऑ-निडस्चें स्मारक झालेलें आहे. मग त्याहूनहि श्रेष्ठ अशा या वीराचें व त्याच्याबरोबर लढून गजापूर खिंड पावन करणाऱ्या मावळ्यांचें

स्मारक आजपर्यंत कां होऊं नये? शिवछत्रपतींनीं बाजी प्रभूंच्या मुलाची विचारपूस करून त्याचा मानसन्मान केला व बाजी प्रभूंच्या पश्चात् त्या मावळी वीरास दरबारांतील मानाचें पहिलें पान देण्याची व्यवस्था करून आपला कर्तव्यद्योतक थोरपणा प्रगट केला हें आपण पाहिलेंच आहे. प्रश्न आहे तो आतां आपण आपलें कर्तव्य करण्याचा.

तसें पाहिलें तर शिवछत्रपतींचें किंवा त्यांच्या प्रभावळींतील ऐतिहासिक थोर पुरुषांचें स्मारक केल्यानेंच त्यांना मोठेपणा येणार आहे किंवा त्यांची स्मृति चिरंतन होणार आहे अशांतला भाग नाहीं. या थोर पुरुषांनीं आपल्या कृतींनीं तो थोरपणा आधींच मिळविलेला आहे, आपलें नांव इतिहासांत चिरंजीव करून ठेविलें आहे. कलिकालालाहि हें नांव पुसून टाकतां आलेलें नाहीं व येणार नाहीं.

तरी इतिहासाचें महत्त्व जाणून भावी पिढीला या घटनेंतून स्फूर्ति मिळत राहावी म्हणून वीरशाली बाजी प्रभूंचें चिरंतन स्वरूपाचें स्मारक होणें जरूर आहे.

बाजी प्रभूंच्या प्रतिमेचीं पोस्टाचीं तिकिटें काढावींत अशी एक कल्पना आहे व त्यासंबंधीं प्रयत्न चालू आहेत. सरकारला हें काम पार पाडणें सहजसुलभ आहे. माझ्या मतें विशाळ गडावर एक फलक ठळकपणें बसवून त्यावर महाराजांच्या पन्हाळा ते विशाळगडाच्या प्रयाणाचा व बाजी प्रभूंच्या व त्यांच्या मावळी पथकाच्या वीररसपूर्ण लढ्याचा ( पावनखिंडींतल्या ) त्रोटक वृत्तांत देऊन या सर्व प्रसंगाचा नकाशाहि दाखवावा. तेथें सहलीस येणारे विद्यार्थी, इतिहासप्रेमी प्रवासी व इतर सर्वसाधारण यात्रेकरू वगैरे सर्वांसच यापासून फायदा होईल, व सर्वांच्या दृष्टीसमोर या घटना खेळवितां येतील.

पावनखिंडीच्या तोंडासमोरहि एक स्मारक-स्तंभ उभारतां येण्यासारखा आहे. किंकेड साहेबानें शाहूछत्रपतींच्या कारकीर्दींत कांहीं

वर्षांमागें असा स्तंभ पावनखिंडीच्या तोंडासमोर उभारल्याचें समजलें, परंतु त्याचा मागमूसहि आम्हांला आमच्या संशोधनाचे वेळीं कोठें दिसला नाहीं. काळाच्या दाढेंत तो ढासळून पडून नाहींसा झाला असावा.

परंतु याहिपेक्षां महत्त्वाचें स्मारक होणें अत्यंत आवश्यक आहे. जेणेंकरून बाजी प्रभूंनीं दाखविलेल्या क्षात्रतेजाचें नित्यशः स्मरण होत राहील असें उचित स्मारक म्हणजे त्यांचे नांवें एखादें 'फ्री मिलिटरी स्कूल' काढून तेथें शिक्षण घेणाऱ्या उत्कृष्ट विद्यार्थ्याला बाजी प्रभुपदक देण्यांत येईल तर त्यांच्या वीरशाली स्वार्थत्यागाचें व त्याच्या उत्कृष्ट सेनानायकत्वाचें सार्थक झालें असें म्हणण्यास हरकत नाहीं. यामुळें भावी पिढीला अशीच वीर्यशाली कामगिरी बजावण्याची स्फूर्ति मिळत राहील.

या कामीं कार्य करणाऱ्या उत्सव समित्या—मध्यवर्ति व स्थानिक—यांनीं हा प्रश्न जारीनें धसास लावावा अशी त्यांस विनंति आहे.

* * *

## १३. स्थित्यंतरें (पन्हाळा, पावनखिंड व विशाळगड)

पन्हाळा व विशाळगड या दोन किल्ल्यांवर ज्या अनेक राजवटी नांदल्या त्यांच्या आपापसांतील लढाया व नवीन निर्मिति यांमुळें वेळोवेळीं या ठिकाणीं फरक पडत गेले. फार काय, शिवकालिन पन्हाळा, तेव्हांची पावनखिंड व तेव्हांचा विशाळगड आणि आजचें त्या त्या ठिकाणांचें स्वरूप यांत जर जमीन-अस्मानाचा फरक पडलेला दिसून येतो तर फार मागच्या कालाविषयीं सांगावयालाच नको.

**पन्हाळा** :—हा इतिहासप्रसिद्ध किल्ला कोल्हापूरच्या वायव्येस १२ मैलांवर समुद्रसपाटीपासून २७७२ फूट उंचीवर सह्याद्रीच्या रांगेंत उभा आहे. [1]" इ. स. १०५० सालीं शिलहार राजवट सुरू झाली. तेव्हांपासून या गडाला ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झालें." [2]" दुसऱ्या भोज राजानें येथें आपली राजधानी केली होती. त्यानंतर त्याचें महत्त्व इतकें वाढलें कीं, यावर सत्ता प्रस्थापित करण्यासाठीं एकसारखीं युद्धें होऊं लागलीं." शिलहारांकडून यादवांकडे, यादवांकडून बहामनी राज्याकडे व त्यानंतर १४८९ मध्यें तो विजापूरकरांचे हातांत गेला. पुढें इ. स. १६६० सालीं तो शिवाजीमहाराजांचेकडे आल्यानंतर सिद्दी जौहरनें त्याला साडेतीन महिने कडक वेढा दिल्यावर महाराजांनीं तेथून शिताफीनें आपली कशी सुटका करून घेतली तें आपण पाहिलेंच आहे.

[3]" बावडा, रांगणा, भुदरगड, सामानगड, पावनगड, विशाळगड आदि १४ किल्ल्यांबरोबर हा किल्ला झाला तरी भोज राजानेंच बांधला. त्याच्यापूर्वी बरींच वर्षें आधीं म्हणजे इ. स. ५०० ते १०५० सालापर्यंत या भागावर कदम्ब, राष्ट्रकूट व पश्चिम चालुक्यांनीं राज्य केलेलें असलें तरी पन्हाळ्याच्या विकासाकडे विशेष लक्ष दिलें तें शिलहार राजांनींच. पण त्यांच्या कारकिर्दींत बांधल्या गेलेल्या सर्व इमारती नंतर आलेल्या मुसलमानी बादशहांच्या अमदानींत जमीनदोस्त केल्या गेल्या. म्हणून आतां आपल्याला पाहावयास मिळत असलेल्या साऱ्या जुन्या इमारती मुसलमान राज्यांतील व मराठेशाहींतील आहेत."

फक्त अंबरखाना ही डोळ्यांत भरण्यासारखी इमारत मात्र दुसऱ्या भोजराजाच्या कारकीर्दींतील आहे. ही इमारत 'धडीव व जाम्या

१, २, ३ कोल्हापूरदर्शन

दगडांतील असून ' ती धान्याचें कोठार म्हणून प्रसिद्ध आहे. पंचवीस हजार खंडी धान्य येथें सांठविलें जात असे असें सांगतात.

[1]" येथील दरवाजे, विहिरी, गडावरची बरीचशी तटबंदी हें सगळें बांधकाम विजापूरकरांच्या हातचें आहे. पन्हाळा अशा रीतीनें अभेद्य करायला त्यांना शंभर वर्षें लागलीं असें सांगतात.... इब्राहिम आदिलशहाचे बरेचसे शिलालेख पन्हाळ्यावर दिसतात."

श्रीयुत डी. बी. पारसनीस यांच्या ' पन्हाळा ' या इंग्रजी पुस्तकांत दिलेल्या माहितीवरून हल्लीं या गडावर जी तटबंदी दिसते ती निरनिराळ्या राजवटींत भर पडत गेल्याचा परिपाक आहे असें म्हटलें आहे.

छायाचित्रांत दाखविलेली सज्जा कोठी ही पन्हाळगडाच्या ईशान्य दिशेला दिसणारी उंच काळीभोर इमारत इब्राहिम आदिलशहाच्या कारकीर्दींत ' मकसूद आका ' यानें इ. स. १६०२ सालीं बांधली, असें तेथील फारशी शिलालेखावरून समजतें. याच राजवाड्यांत इ. स. १६६० सालीं महाराज सिद्दी जौहारच्या वेढ्यांतून जवळच असलेल्या ' राजदिंडी मार्गानें ' विशाळगडाकडे गेले. ही राजदिंडी आतां पडिक अवस्थेंत जीव धरून आहे. महाराज या इमारतींतल्या एका खिडकींतून उडी मारून गेले असें जें सांगितलें जातें, तें मात्र चुकीचें आहे. पन्हाळगड महाराजांचेच ताब्यांत असतांना त्यांना खिडकींतून पळून जाण्याचें प्रयोजनच काय ?

आज ' वाघ दरवाजा ' व ' चोर दरवाजा ' हे पडलेले दिसतात. ' तीन दरवाजा ' मात्र चांगल्या स्थितींत आहे व त्यांतील दगडी बांधकाम शिशाच्या रसांत पक्कें केलेलें दिसतें. या तीन दरवाज्यांपासून जवळच तट ढांसळलेला दिसतो. त्याचें कारण १८४४ मध्यें

---

१ " महाराष्ट्राचीं धारातीर्थें " पृष्ठ १४८

कोल्हापूरच्या बंडखोरांनीं हा किल्ला ताब्यांत घेतला तेव्हां त्यांना हुसकून लावण्यासाठीं इंग्रजांनीं चढाई करतांना तटावर तोफा डागल्यामुळें झालेली नासधूस होय. लढाया म्हटल्या कीं, नासधूस व्हावयाचीच !

इ. स. १८२७ मध्यें कर्नल वेल्श पन्हाळ्यावर आल्यानंतर त्यानें पाहणी करून मारलेला शेरा अत्यंत महत्त्वाचा आहे. तो म्हणतो,

" The persevering industry which could finish such massive fortifiications, embracing the summit of a basaltic mountain, at least four miles in circumference, is really astonishing and of **all the hill forts I have seen in India, Punallaghur is the most complete both by nature and art.** "

" ज्या टणक काळ्याशार पर्वताचा परिघ कमींत कमी चार मैल आहे अशा पर्वतावरील शिखरावर मजबूत तटबंदी करणाऱ्यांचे चिकाटीचे परिश्रम पाहून मन थक्क होतें. स्वभावतः व तटबंदीच्या दृष्टीनें पन्हाळगड हा हिंदुस्थानांतील मीं पाहिलेल्या सर्व डोंगरी किल्ल्यांमध्यें अत्यंत परिपूर्ण आहे यांत संदेह नाहीं. "

" या गडाचा परिघ सुमारें ४$\frac{1}{2}$ मैल असून आंतल्या बाजूस ५० फूट कडा तुटलेला आहे आणि त्या जागीं ठेंगणी भिंत बांधून त्याला बळकटी आणलेली आहे. दुसऱ्या बाजूला माथ्याजवळ १५ ते २० फूट जाडीचा भरभक्कम तट असून त्यावर तोफा चढविण्याकरतां सोयीस्कर अंतरावर बुरूज आहेत. पूर्वीं किल्ल्यावर जाण्यासाठीं तीन मोठे दुहेरी दरवाजे होते. "

आणि आज ! आज हे 'दुहेरी दरवाजे' होते हें सांगूनच समजून घ्यावयाचें ! 'नायकिणीचा सज्जा' म्हणजे एके वेळीं

मुसलमानी बादशहांची ऐषआराम करण्याची ऐटदार इमारत ! आज ती ढासळलेली भिंत दिसते. दिंडी दरवाजाची दिंडी पण धड ठिकाणाला नाहीं. आज पन्हाळा म्हणजे एक हवाखोरीचें ठिकाण म्हणूनच त्याला महत्त्व येत चाललें आहे. श्रीमंतांचे नवीन बंगले उठत आहेत. नवीन वस्ती होत आहे, नवीन नवीन दुकानें निघत आहेत. तास दीड तासानें एस्. टी. बसेस थेट वरपर्यंत येऊन थडकत आहेत. रमणीय उद्यानें आणि 'हॉलिडे होम्स' थाटलीं गेलीं आहेत. विजेचा झगमगाट आहे. वाचनालय, क्रीडांगण, साऱ्या सुखसोयी उपलब्ध आहेत. पण पूर्वीची झाडी पुष्कळच तोडली गेली. जुनें वैभव शोधूं जातां नीट दिसत नाहीं. पूर्वीचा पन्हाळा तो हा पन्हाळा नव्हे. त्याचें ऐतिहासिक महत्त्व दिवसेंदिवस लोपत चाललें इतकें मात्र खरें.

**पावनखिंड**—पन्हाळ्यापासून वायव्येस २४ मैलांवर व विशाळ गडाहून ६ मैल अंतरावर पांढरेपाण्यानजीक ही खिंड आहे. हिलाच 'गजापूरखिंड,' 'घोडखिंड,' 'घोडेखिंड' किंवा वीरांचे रक्तानें पावन झाली म्हणून 'पावनखिंड' म्हणतात. या खिंडीला कोल्हापूरहून जाण्याचे मार्ग दोन आहेत:—

एक मार्ग म्हणजे कोल्हापूरच्या वायव्य दिशेला ३९ मैलांवर असलेल्या आंबा गांवाहून ८ मैलांवर 'केमरुणवाडी' नांवाची वाडी लागते. ह्या बैलगाडीच्या मार्गें पूर्वेस १॥ ते २ मैल चालत गेलें कीं, जी खिंड लागते त्यांत प्रवेश करणें. किंवा एस. टी.नें 'कोल्हापूर ते विशाळगड' ही बस घेऊन कोल्हापूरपासून ४६ मैल ४ फर्लांगांवर 'केमरूणवाडीस' बस थांबते तेथें उतरून खिंडीपर्यंत चालत जाणें.

आम्ही हा दुसरा मार्ग पसंत केला. कारण आम्हांला विशाळगड व पावनखिंड दोन्हीं ठिकाणें एकाच वेळीं पाहावयाचीं होतीं. आम्ही

केमरूणवाडीस उतरून गजापूर गांवांत मुक्काम करून दुसरे दिवशीं सकाळीं पावनखिंडीस जावयास निघालों. कोल्हापूरहून आमचे बरोबर जें पथक निघालें त्यांत कोल्हापूरचे बॅ. पारसनीस हे प्रमुख होते. मलकापूरहून शाहीर वांगीकर हे आम्हांस वाटेंत मिळाले. केमरूणवाडीच्या अलीकडे मैल दीड मैल गजापूर गांव आहे. आमचा मुक्काम गजापुरांतील सरपंच जयराम बापूजी सिंधकर यांचे घरीं होता. त्यांनीं आमची उत्तम व्यवस्था ठेवली.

दुसरे दिवशीं सकाळीं २ फेब्रु. १९६० आम्ही ८ चे सुमारास पावनखिंडीकडे जावयास निघालों. आमचे बरोबर कोल्हापूरहून मुद्दाम घेतलेले श्रीयुत जयवंत सूर्यवंशी हे फोटोग्राफरहि होते, बॅ. पारसनीस मात्र आमचे बरोबर नव्हते. कारण त्यांनीं पूर्वी दोनदां पावनखिंड पाहिली होती. मुख्य वाटाड्या म्हणून बाळू रामजी पाटील, गांवकामगार पोलीस पाटील हा होता. याचें वय ६५ वर्षांचे असून हा खुद्द गजापूरचाच रहिवासी होता. शाहीर राजाभाऊ वांगीकर, ग्रामसेवक चव्हाण, वाळवणकर, दिलीप पारसनीस इत्यादि मंडळी या पथकांत होतीं. आमचा पहिला फोटो गजापुरांतील माळावर घेतला. या माळाला ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झालें आहे तें दोन गोष्टींमुळें. येथेंच १६६० सालीं शिवाजीमहाराज पन्हाळ्याहून विशाळगडाकडे निसटून गेल्यावर त्यांच्या पाठीवर सुटलेले सिद्दी मसूदचें व फाजलखानाचें सैन्य पावनखिंडींत सरदार बाजी प्रभु लढतां लढतां धारातीर्थीं पडल्यावर कांहीं वेळ तळ देऊन बसलें. येथूनच त्यांनीं विशाळगडावर महाराज असल्यामुळें त्या किल्ल्याला वेढा घालून तो घेण्याचा कसून प्रयत्न केला. याच ठिकाणीं इ. स. १७०२ मध्यें विशाळगड हस्तगत करण्यासाठीं सरसावलेल्या दिल्लीच्या अवरंगजेब बादशहाची दोन लाख सैन्याची छावणी पडली

होती. स्वत: बादशहाहि हजर होता असें म्हणतात. म्हणूनच या माळाला 'बादशहाचा माळ' म्हणतात.

एस्. टी.च्याच वाटेनें मैल दीड मैल चालून आम्ही केमरूणवाडी-पर्यंत आलों. ज्या ठिकाणीं $\frac{७}{४}$ असा मैलाचा दगड आहे, तेथून पूर्व दिशेनें कासारी नदीच्या किनाऱ्यानें आम्ही पावनखिंडीच्या रोखानें पुढें चाललों. शिवाजीमहाराज आपल्या ३०० निवडक सैन्यासह पावनखिंडींतून विशाळगडाकडे गेले ती हीच वाट. आम्ही फक्त त्यांच्याविरुद्ध दिशेनें पावनखिंडीकडे जात होतों. नदीचा प्रवाह संथ झुळझुळ असा वाहत होता. मधून मधून पक्षांचें मंजुळ कूजन ऐकूं येई. ह्यामुळेंच कीं काय, शाहीर वांगीकर यांना कवन सुचूं लागलें. पुष्कळ वेळां कांट्याकुट्यांतून मार्ग काढीत जावें लागें. परंतु या जंगलमय प्रदेशांतील निसर्गाचें रम्य दृश्य पाहून आमचे श्रमपरिहार होत होते. केमरूणवाडीपासून सुमारें दीड मैल चालल्यावर आम्ही एका निसरड्या कड्यापाशीं आलों. कडा चढण्यास अत्यंत अवघड असल्यानें एकमेकांचें साहाय्य घेऊन वरती आलों. तेथून परत खालीं उतरावें लागलें. वाटेंत अणकुचीदार लहानमोठ्या गोट्यावर पाय देत, तोल सावरीत आस्ते कदम आगेकूच करीत, कासारी नदीचा ओघ जेथें अगदीं चिंचोळा होतो, तेथें येऊन पोहोंचलों. म्हणजे आम्ही सहा फर्लांग लांबीची ही घोडखिंड अथवा पावनखिंड ओलांडून तिच्या दुसऱ्या तोंडास आलों होतों. हीच ती घोडखिंड, घोडेखिंड किंवा जेथें नररत्न बाजी प्रभूंनीं राष्ट्रकार्यासाठीं धारातीर्थीं देह ठेवला तीच पावनखिंड होय. या पावनखिंडीचा शोध घेतल्यानें आम्हांला धन्य वाटलें. धन्य ते बाजी प्रभु !

खिंडींतून वरती खिंडीचे तोंडास येणें म्हणजे एक दिव्यच ! वर चढण्यास दगडाचा धडसा आधारहि मिळेना. एका झाडाच्या मुळीचा

आधार घेऊन साथीदारांच्या साहाय्यानें कसेंबसें आम्ही वर चढलों. खिंडीच्या तोंडावरून खालीं घळींत मोठमोठे दगड ढासळून पडल्याचें दिसून आलें. त्यावरून हें सिद्ध होतें कीं, खिंडींत खालीं उतरण्याच्या तोंडावाटें बरीच पडझड झाल्यानें ३०० वर्षांपूर्वींच्या या खिंडीचे नैसर्गिक स्वरूपांत कालमानानुसार फरक पडलेला आहे.

तरी पण एकंदरींत खिंडीच्या चिंचोळ्या भागांत एखाद्या लढवय्यानें किंवा दोघांतिघांनीं अनेकजणांविरुद्ध लढत देतां येईल अशी ही खिंड असल्याची साक्ष पटते. दोन बाजूला प्रचंड असे तुटलेले कडे व आंतून दूरवर गेलेली ही चिंचोळी खिंड लष्करी दृष्टीनें (from stratagic point of view) त्या कालीं अत्यंत मोलाची असल्याची खात्री होते.

पन्हाळ्यावरून आलेली पायवाट येथेंच खिंडीजवळ मिळते. या खिंडींतूनच पुढें विशाळगडाकडे कासारी नदीच्या किनाऱ्या किनाऱ्यानें शिवाजीनें घोडदौड केली.

खिंडीवर चढल्यावर वरती आजूबाजूस विस्तीर्ण पठार लागतें. पूर्वीं या पठारावर दाट झाडी होती. येथून आंत शिरकाव होण्यास मार्गच खुला नव्हता. विशाळगडाकडे वाट होती ती फक्त घोड-खिंडींतूनच. याच पठाराला 'घोडमैदान' म्हणतात. खालीं जवळच आहे ती घोडखिंड आणि हें घोडमैदान. पण आज या पठाराचें स्वरूपहि पार बदललें आहे. गेल्या तीनशें वर्षांत जंगलतोड खूपच झाल्यामुळें या पठारावरून हल्लीं विशाळगडाकडे जाण्यास सुलभ वाट मोकळी झाली आहे. या घोडमैदान मार्गानेंच आम्ही सुलभतेनें केमरूणवाडीस परत गेलों व तेथून दुपारीं एक वाजतां गजापूर गांठलें.

**विशाळगड :**—हा इतिहासप्रसिद्ध किल्ला कोल्हापूरच्या वायव्येस सुमारें ५० मैल सह्याद्रीच्या रांकेंत समुद्रसपाटीपासून

३३४४ फूट उंचीवर वसलेला आहे. त्याची लांबी, ३२०० फूट व रुंदी १०४० फूट आहे. [1]" याचें प्राचीन नांव 'खिलखिला' असून पुढें मुसलमानी अमदानींत 'खेळणा' अथवा खिळणा असें ठेवण्यांत आलें." इ.स. १६५९ च्या अखेरीस शिवाजीमहाराजांनीं पन्हाळा, रांगणा हस्तगत केले तेव्हांच हाहि किल्ला मुसलमानांचे कडून ताब्यांत घेऊन त्याचें 'खेळणा' हें नांव बदलून "विशाळगड" असें नवीन नांव यास दिलें. या नांवाप्रमाणें हा खरोखरीच भव्य आणि 'विशाल' आहे." [2]" सह्याद्रीपासून अलग असून पंधरा फूट रुंदीच्या एका पायवाटेनें पर्वताच्या मुख्य रांकेशीं जोडला गेल्यानें त्याला चारी बाजूंनीं तीन हजार फूट उंचीच्या कडयाची नैसर्गिक तटबंदी मिळाली आहे." शिलहारवंशीय दुसरा भोज राजा यानें विशाळगड, पन्हाळा, रांगणा, भुदरगड इत्यादि पंधरा किल्ले बांधले असा उल्लेख सांपडतो. इ. स. १३१८ नंतर सर्व दक्षिणेकडील प्रांत दिल्लीच्या बादशहाच्या साम्राज्यांत सामील झाला तेव्हां हा किल्ला त्यांचे ताब्यांत गेला. इ. स. १३५० नंतर 'हा मुलुख विजयनगरच्या साम्राज्याखालीं होता. तरी तेथील स्थानिक सत्ता एतद्देशीय मराठा पाळेगार लोकांच्या हातांतच होती. इ. स. १६५९ मध्यें तो शिवाजीमहाराजांचेकडे आला हें वर सांगितलेंच आहे. [3]" गडाची दुरुस्ती करून 'राज्याभिषेकाचे वेळीं म्हणजे इ. स. १६७४ मध्यें तो महाराजांनीं रामचंद्रपंत अमात्य यांचे ताबीन ठेवला...."

तेव्हां महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार यांनीं 'किल्ले विशाळगड' या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत म्हटल्याप्रमाणें "विशाळ-गड किल्ला हा इतिहासांत नांवाजलेल्यांपैकीं एक आहे. मराठे

१, २, ३ 'किल्ले विशाळगड' पृष्ठ १

शाहीचा तर हा कांहीं काल कलिजाच होऊन राहिला होता. महाराष्ट्राच्या इतिहासांतील अत्यंत थोर थोर व्यक्तींचा संबंध या किल्ल्याशीं आलेला आहे. " तेव्हां अशा या गडाचें दर्शन घेण्याचा योग गेल्या वर्षाच्या अखेरीस आला म्हणून आनंद वाटला. विशेषत: 'पन्हाळा ते विशाळगड' हें १६६० सालीं १३ जुलैला महाराजांचें झालेलें ऐतिहासिक प्रयाण कसें घडून आलें हें समजून घेण्याचें भाग्य लाभलें हा एक सुयोगच म्हणावयाचा.

आम्ही कोल्हापूर ते विशाळगड हा मार्ग एस्. टी. बसनें आक्रमिला. एस्. टी. नें हें अंतर ५१ मैल २ फर्लांग आहे. आमची बस सकाळीं ६। ला कोल्हापूरहून निघून १। ते १॥ चे सुमारास विशाळगडास पोहोंचली. कोल्हापूर–रत्नागिरी या मोठ्या इंपिरियल रोडवरून आमची गाडी रम्य प्रदेशांतून चालली. बांबवडे, मलकापूर, आंबा असे महत्त्वाचे टप्पे घेत, आंब्याहून विशाळगडाकडे फुटलेल्या फाट्यानें पुढें दाट जंगली व डोंगराळ भागांतून केमरूण-वाडीवरून थेट विशाळगडच्चे पायथ्याशीं आलों. कोल्हापूरपासून ९ मैलांवर आमची गाडी आली तेव्हां रम्य पन्हाळ्याला डावी घालून व ज्योतिबाचे डोंगरास उजवी घालून १० हजार वस्तीचें मलकापूर या कोंकण व देश यांचेमध्यें वसलेल्या महत्त्वाच्या व्यापारी उतार-पेठेजवळ आलों. येथें मोठी बाजारपेठ आहे व खालीं कोंकणांत लागणारा माल (गूळ, मिरची, कांदे, शेंग, हळद वगैरे, येथेंच खरीदला जातो. गांवाशेजारून शाळी व कडवी अशा दोन नद्या वाहतात. त्यामुळें कोबी, नवलकोंद, कॉली फ्लॉवर या ताज्या भाज्या थंडीचे मोसमांत या गांवीं स्वस्त व ताज्या मिळतात. तसेंच ताजीं दाणेदार मक्याचीं कणसेंहि मिळतात. उन्हाळ्यांत आंबे, फणस, जांभळें, कलिंगडें वगैरे फळफळावळें मुबलक मिळतात. येथून पुढें

आंबा नांवाचें निसर्गरम्य व हवेशीर थंड असें ठिकाण लागलें. येथूनच पुढें थोड्या अंतरावर 'चक्रभराव' नांवाचा आंबा–घाटापैकीं अवघड भाग लागतो व खालीं 'साखरपा' नांवाचें गांव आहे. येथून खरें कोंकण सुरू होतें. साखरपें तें राजपूर एस्. टी. मार्ग आहे. "कोल्हापूरच्या डोंगराळ बाजूस शंभर मैलांच्या हद्दींत सह्याद्रीपासून खालीं कोंकणांत उतरण्याचे सुमारें ९० घाट आहेत. त्यांपैकीं या आंबें गांवापासून दोन ते तीन मैलांवर असलेला 'आंबा घाट' आहे. उत्तरेचा 'आंबा घाट' मधला 'फोंडा घाट' व दक्षिणेचा 'आंबोली घाट' होत." आंबा घाटाचा प्रदेश निसर्गरमणीय आहे.

विशाळगडाचें दर्शन होतांच अत्यंत समाधान वाटलें. एक तर त्याचें आजचें नैसर्गिक सौंदर्य पाहून; आणि दुसरें म्हणजे पन्हाळा ते पावनखिंड या मार्गें शिवाजीमहाराज सिद्दी जौहरच्या वेढ्यांतून निसटून ज्या वाटेनें विशाळगडावर चढले ती, हल्लींची पायऱ्या पायऱ्यांची वाट सोडून, जरा बाजूनें गेलेली, महाराजांच्या पदाघातांनीं पावन झालेली वाट पाहून! ती वाट बरीच अवघड आहे. सध्यांच्या वाटेंतहि 'विशाल' दगड लागले. या गडाचें हें विशाल स्वरूप पाहून शिवाजीमहाराजांनीं याला दिलेलें 'विशाळगड' हें नांव सार्थ वाटतें. [1]"हल्लीं हा गड ओसाड असून तेथें फार तर १०–१२ घरें असतील. किल्ल्याचे बहुतेक बुरूज पडलेले असून तटबंदी ठिकठिकाणीं ढासळलेली आहे. त्यामुळें किल्ल्याचें पूर्वीचें वैभव जरी आतां नष्ट झालेलें असलें तरी त्याचें नैसर्गिक सौंदर्य मात्र कायम आहे. गजापूरकडची दर्शनी बाजू सोडली तर किल्ल्याच्या साऱ्या बाजूंनीं खोल दऱ्या आणि सह्याद्रीच्या प्रचंड दाट व विक्राळ सोंडा यांचा गराडाच पडल्याचा भास होतो. तो देखावा पाहतांना डोळे फिरतात."

१. 'कोल्हापूरदर्शन' पृष्ठ ५२.

विशाळगडाकडे सहज जरी दृष्टिक्षेप केला तरी वरील वर्णनांतील सत्यता पटते.

शिवाजीमहाराजांचा वाडा आज अगदींच पडिक अवस्थेंत दिसतो. त्यावरून त्या वाड्याचें पूर्वीचें स्वरूप समजण्यास साधन नाहीं. 'खलबतखाना' नांवाची महाराजांची गुप्त सल्लासमलतीची खोली आम्ही पाहिली. तसेंच मारुतीचें टेक, सतीचें वृंदावन, मुंडा दरवाजा ( टेहळणी बुरुज ) रणमंडळ, 'बावन सती' वेताळ टेकडी, रोजा, दारूचें कोठार, अर्धचंद्री विहीर (अष्टमीच्या चंद्रबिंबाकृति) वगैरे इतर पाहण्यासारखीं स्थळें आहेत. परंतु या सर्वच ठिकाणीं वेळ दवडणें आम्हांला शक्य नव्हतें. एस्. टी.नें आम्हांला केमरूणवाडीस उतरून दुसऱ्या दिवशीं पावनखिंड गांठावयाची होती. आमचें सारें लक्ष तिकडे केंद्रित झालें होतें. तरी पण वर गेल्याबरोबर प्रथम व पुनः परततांना आम्हीं पांढऱ्या शुभ्र घुमटाच्या इमारतींत असलेल्या मलिक रैहान या साधु पुरुषाच्या कबरस्थानाचें दर्शन घेतलें. १९३९ सालीं या दर्ग्याचा जीर्णोद्धार झाल्यामुळें ही इमारत नवीन दिसते. हा पीर नवसाला पावतो अशी समजूत आहे. या गडावर दरवर्षी मोठा उरूस भरतो व त्यावेळीं पांच ते सहा हजार हिंदु-मुसलमान भाविक यात्रेकरू जमतात. आम्ही येथें येण्यापूर्वीं थोडेच दिवस अगोदर ही जत्रा भरली होती.

सतीच्या वृन्दावनाचा जीर्णोद्धार १९४० सालीं कोल्हापूच्या छत्रपतींनीं केला व तेथें टुमदार छत्री बांधली.

अशा रीतीनें आम्ही विशाळगडावर तास दीड तास हिंडून विशाळगडाच्या प्राचीन व उज्ज्वल वास्तुदेवतेस सद्गदित अंतःकरणानें प्रणाम करून परतलों.

# आधार-ग्रंथांची यादी


१. शिवभारत—( कवींद्र परमानंद )

२. शिवदिग्विजय बखर

३. कृष्णाजी अनंत सभासद बखर

४. ९२ कलमी बखर

५. मल्हार रामराव चिटणीस यांची बखर

६. Shivaji and His Times—( Shri. Jadunath Sarkar ).

७. ' Panhala '—( Shri. D. B. Parasnis, 1923 )

८. ' A History of the Maratha people ' ( C. A. Kincaid c. v. o. )

९. ' Poona In Bygone Days ' ( D. B. Parasnis 1921 )

१०. Outline of History ( H. G. Wells )

११. मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष ( महादेव गोविंद रानडे यांच्या Rise of the Maratha Power चें रूपांतर )

१२. ' वीररत्न बाजी प्रभु देशपांडे ' ( बा. स. कुलकर्णी )

१३. ' किल्ले विशाळगड ' ( पं. बा. शिरवाळकर )

१४. ' Imperial Agra of the Moghuls ' ( K. C. Muzumdar )

१५. ' महाराष्ट्राचीं धारातीर्थें ' ( पं. महादेवशास्त्री जोशी )

१६. ' सह्याद्रि ' ( सदाशिव आ. जोगळेकर )

१७. ' राजा शिवाजी ' ( रियासतकार सरदेसाई )

१८. कोल्हापूरदर्शन (

१९. छत्रपति शिवाजी : शास्त्री हरदास )

२०. छत्रपति शिवाजीम

२१. राजा शिवछत्रपति

२२. प्रभुरत्नमाला, प्रथम गुच्छ.


REFBK-0008895